

# श्रीसाईलीला



जुलै १९६३ | गुरुपौर्णिमा अंक | कि. ५० न. पैसे.


स्थापना १९१८
साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे
सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी
ई. आर. मालपेकर
जिनेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २
टे. नं.
६९६३१



# श्री साई वाक्सुधा

तुम्हीं गुरुवचनावर नेहमीं विश्वास ठेविला पाहिजे. तुमचा स्वार्थ व परमार्थ त्यामुळेंच साध्य होणार आहे. दुसऱ्याचे दोष कधींहि पाहूं नये. कुटीलपणा सोडून द्यावा. न्यायनीतीनें वागावें. सर्वांबद्दल सद्भावना व समभाव असावा. जो तत्परतेनें गुरुसेवा करतो, गुर्वाज्ञा कधींहि उल्लंघन करीत नाहीं व बरेंवाईट जें माझें काय व्हायचें असेल तें माझे गुरुजी पाहून घेतील; त्याची चिंता मी करणार नाहीं. अशा भावनेनें व श्रद्धेनें जो वागतो त्याच्यावर गुरुची कृपा झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यानें स्वतंत्रपणें विचार करायलाच नको. तो सारा भार गुरुवर टाकून मोकळा व्हावयाचें हेंच त्याचें कर्तव्य. ‘चित्त साई स्मरणीं। दृष्टि साईसमर्थ चरणीं। वृत्ति साईध्यान धारणीं। देह कारणीं साईच्या॥’ अशी वृत्ति बनली पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित


# श्रीसाईलीला

[शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक]

वर्ष ४२ वें] जुलै १९६३ [अंक ४ था

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

‘साई निकेतन,’ डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

एखाद्याची निंदा नालस्ती करणें हें अत्यंत वाईट कर्म आहे. परंतु आमच्यापैकीं पुष्कळांस ती खोड जडलेली असते! जडलेली म्हणजे काय? तो स्वभावगुणच बनलेला असतो कित्येकांचा! दुसऱ्याबद्दल कांहीं कारण नसतां त्याची निंदा केल्यानें तुम्हांला काय बरें मिळणार आहे? त्यामुळें तुमचा कांहीं तरी फायदा होण्याचा संभव आहे का? परंतु नाहीं. स्वभावाला औषध का आहे?

साईबाबाना अशा माणसाबद्दल भारी दुःख होत असे. आणि कां दुःख होत असे आणि कां होऊं नये? दुसऱ्याची चेष्टा, निंदा नालस्ती केल्यानें नुकसान किंवा पतन कोणाचें होतें? तुमचेंच कीं नाहीं? मग कांहीं कारण नसतां तुम्हीं वरच्या पातळीवर जायचें सोडून खालच्या पातळीवर कां बरें जावें?

बाबा याबाबतींत त्यांच्याजवळ येणाऱ्यांस वारंवार इषारा देऊन त्यांना योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत असत. माणसानें नेहमीं वर वर जाण्यासाठीं धडपडावयाचें असतें. साधना करावयाची असते. वाणी, निंदा नालस्तीनें विटाळावयाची नसते. वाणीचें वरदान तुम्हांला कशासाठीं मिळालें आहे? नसत्या उठाठेवी नसत्या उचापती, निंदा, नालस्ती करून ती वाणी विटाळणें हाच का तुमचा धर्म?

आपल्या सभोंवारचें जग किती विचित्र आहे! तें सुष्टांपेक्षां दुष्ट माणसांनीच जास्त भरलेलें आहे. या सभोंवारच्या जगांत आपल्या वाणीवर संयम ठेवणारे, मुखावाटे दुष्ट किंवा वाईट शब्द न काढणारे महात्मे तुम्हांला किती मिळतील बरें!

येथें एका सुंदर कवि वचनाची आम्हांला आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. कवि म्हणतो :—

**पाहावें तिकडेच लिंब जगतीं कोठेंतरी चंदन**
**पाषाणीं भरल्या महींत विरळा येई हिरा लाभुन ॥**
**काकांचा रव नित्य कूजन करीं चैत्रीं कधीं कोकिळा ॥**
**दुष्टांच्या जगतांत थोर पडती दो–तीनची दृष्टिला ॥**

अर्थात जगभर बघावें तिकडे कडू लिंबाची झाडेंच फार. चंदन कुठें तरी एकादाच. पृथ्वी नुसती दगड धोंड्यांनीं भरलेली आहे. हिरा एकादांच. कावळ्यांची कटकट नेहमींचीच. कोकिळांचें कुहू कुहू वर्षांकाठीं चैत्रांत काय तें ऐकूं येतें! एकूण या जगीं बुजबुजाट दुर्जनांचाच. निंदा नालस्ती करणाऱ्यांचाच. सज्जन कुठं दोन, तीन असतील नसतील!

अशा या जगाच्या स्थितींत थारेपालट घडून यावा, जग आहे त्यापेक्षां अधिक सुखी, अधिक सुंदर व अधिक सुष्ट लोकांनीं भरलेलें व्हावें, जनता देवधर्मांकडे अधि-

काधिक वळावी, लोकांनीं खालच्या नीचावस्थेंतून वरच्या पातळीवर यावें, असें बाबांना फार फार वाटत असे. आणि म्हणून कोणाची कानउघाडणी करण्याची संधी आली असतां ती ते सहसा दवडीत नसत. तो बोध एकट्या करतांच नसे; तर सर्व लोकांसाठीं असे.

बाबा हे गुरूंचे गुरू—परात्पर गुरू होते. त्यांना समाधिस्थ होऊन पंचेचाळीस वर्षें होऊन गेलीं. त्यांच्या काळच्या स्थितींत आज कांहीं तरी सुधारणा घडून आली आहे का ! कांहीं नाहीं. पूर्वी जग होतें तेथेंच आजही आहे. धार्मिक व नैतिकदृष्ट्या जगाचें पाऊल बिलकूल पुढें पडलेलें नाहीं. पुच्छप्रगति झाली आहे असें वाटल्यास म्हणतां येईल !

आजही बाबांच्या शिकवणुकीची आम्हांला फार जरुरी आहे. आमच्या सभोंवारच्या लोकांत दुसऱ्यांची उगाच निंदानालस्ती करणारीं माणसें तुम्हांला वाटेल तेवढीं सांपडतील !

एकदां बाबांच्या भेटीला बाहेर गांवाहून एक वकील आले. वकील म्हणजे शिकले—सवरलेले. ते आले ते बाबांच्या दर्शनासाठीं मशिदींत गेले. दर्शन घेतलें. नमस्कार केला, पुढ्यांत दक्षणा ठेविली आणि एका बाजूला जाऊन बसले. तेथें बाबा कांहींना कांहीं बोलत होते. त्या बोलण्यापासून प्रत्येकानें कांहीं ना कांहीं बोध घ्यावयाचा असे. बाबांची दृष्टि सहज त्या वकील महाशयांकडे गेली आणि ते म्हणाले, "लोक किती वस्ताद आहेत पहा ! येथें येतात, पाया पडतात; दक्षणा अर्पण करतात आणि आंतून शिव्याही द्यायला कमी करीत नाहींत. आंत एक आणि बाहेर एक ! काय सांगावें या लोकांना ! ही यांची भक्ति ! यांना देव कसा बरें पावेल ?"

वकील महाशयांस उद्देशून बाबांनीं हे उद्गार काढले व वकील महाशय मनांतल्या मनांत जें कांहीं उमजायचें तें उमजून चुकलें ! तेथून नंतर ते वाड्यांत वस्तीसाठीं गेले. तेथें दिक्षीतांजवळ ते म्हणाले, "काय हो ! बाबांनीं येथें आल्याबरोबर माझी चांगलीच झडती घेतली ! त्याचें असें झालें ! आमचे मुन्सफ प्रकृती ठीक नसल्यामुळें येथें रजा घेऊन बाबांच्या सेवेंत राहिले होते. आम्ही सहज वकिलांच्या खोलींत बसलों होतो, वकील मंडळी गप्पा मारीत होती. तेथें—कशाला आमचे मुन्सफसाहेब गेले आहेत शिर्डीला ? औषधपाण्याशिवाय काय प्रकृति सुधारणार आहे ? साईबाबांच्या नादीं लागून काय होणार आहे ? अशा आमच्या गप्पा झाल्या हें खरें ! परंतु त्या पहा कशा बाबांच्या कानापर्यंत येऊन पोहोंचल्या ! आतां काय सांगणार ?'

त्यावर दीक्षितांनीं त्यांना बरोबर समजून सांगितलें. हा ताशेरा नसून तो बाबांचा अनुग्रह आहे. प्रत्येकानें सद्वर्तनी व्हावें. भलेपणानें वागावें. कोणाचीही निंदानालस्ती करून स्वतःची जीभ विटाळूं नये, ही बाबांची नेहमीची शिकवण आहे ! तुम्हीं शंभर

कोसांवर असा कीं पाचशें कोसांवर असा. तुमच्या विचारांचा वारा बाबांपर्यंत पोहोंचल्याशिवाय रहाणार नाहीं. तुम्ही कुठें कांहीं करा. कांहीं बोला. त्यांच्या खबरा बाबांना बीनतारी तारायंत्रानें समजल्याशिवाय रहात नाहींत !

वकील महाशयांस हा योग्य धडा मिळाला. त्या दिवसापासून त्यांनी पक्का निर्धार केला कीं, यापुढें कोणाची निंदा नालस्ती करायची नाहीं; ती जिथें चालली असेल तिच्या वाऱ्यालासुद्धां उभें रहावयाचें नाहीं !

प्रिय वाचक ! हा गुरुपौर्णिमेचा महत्त्वाचा व शुभ आठवडा आहे. बाबांसारखे कृपावंत, मायाळू व आमच्या कल्याणासाठीं झटणारे सद्गुरु बाबाच ! त्यांचें स्मरण करून आपण निर्धार करूं या कीं आम्हींही कधीं कोणाची निंदानालस्ती करून स्वतःची जीभ विटाळणार नाहीं. त्या विषाच्या, दुर्गंधाच्या वाऱ्यालाही उभे रहाणार नाहीं.

—संपादक

---


# जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३




**बाबांचा दृष्टांत—**

**सौ.** सुमती पाटगांवकर, इंदुर ह्या लिहितात कीं, माझे पती ( आनंदराव पाटगांवकर ) हे सतत तीन वर्षे (१९५१–५३) बरेच आजारी होते. नामांकित वैद्यांचे व डॉक्टरांचे इलाज सतत चालू होते; तरीहि प्रकृतीस आराम वाटत नव्हता. गेल्या दोन पिढ्यांपासून साईबाबा हेंच माझ्या माहेरचें आराध्य दैवत आहे. मी रात्रंदिवस बाबांच्या चरणी माझें गाऱ्हाणें भक्ति–भावपूर्वक रुजू करीत होतें. यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली होती. हेहि बाबांचे भक्त त्यांचीहि प्रार्थना सतत चालू असे. उदी व तीर्थ नियमीतपणें घेत असत. काळजी वाढत चालली होती. इतक्यांत एके दिवशीं तापाचें प्रमाण खुप वाढलें. आम्हीं सर्व घाबरून गेलों. इतक्यांत ते बडबडूं लागले " अरे विरू ! शिलू इकडे यारे ! बाबा आले आहेत ! " मलाहि हांक मारूं लागले, मी जवळच बसून होतें.

" बाबा, माझें कसें होणार " असें डोळयांत आंसवें आणून ते पुटपुटत होते.

इतक्यांत ( त्यांनीं मागाहून सांगिल्याप्रमाणें ) त्यांना दृष्टांत झाल्यासारखा वाटला कीं " बेटा ! घबराओ मत ! तुम अच्छे हो जावंगे. मै तुम्हारे पास हूं. तसबीर को हार चढाओ, धुप जलाओ खुराक, गोलिया लेव अच्छे हो जाओगे. मैं तो पास हूं यह घरमें हूं. बाबा भला करें गा "

वरील दृष्टांतानंतर त्यांनीं डोळे उघडले. ताप कमी होऊं लागला. सभोंवार घरांतील सारी मंडळी जमा झाली होती. ताप उतरला तरी त्यांना डॉक्टरी सल्ल्यावरून दवाखान्यांत ठेवण्यांत आलें. त्यानंतर एका महिन्यांत यांची तब्यत हळु हळु सुधारत गेली. खाणें पिणें सुरू झालें व वजनही वाढत गेलें ! आतां प्रकृति पुर्ण निकोप होऊन नियमीतपणें कामकाज करतात. अशी आहे बाबांची लीला !

× × ×

**जो मजलागीं अनन्य शरण—**

श्री. हनुमानसिंह ठाकोर, ७६३ कसबा, पुणें २ हे लिहितात कीं, श्रीसाईनाथ महाराजांच्या कृपेनें पुण्यांत सतत गेली अकरा वर्षे बालमित्र श्रीसाईनाथ भजनी मंडळ ७६३, कसबा पेठ ही संस्था चालू आहे. या भजनी मंडळांत सुमारें तीस मुलें व मुली असून ( ६ ते १८ वर्षांपर्यंतचीं ) दर गुरुवारीं बाबांच्या भजनांचा व आरतीचा कार्य-

क्रम होत असतो. त्यावेळीं मोठी माणसेंही हजर असतात. त्यांपैकीं श्री. कृष्णराव न. सोहनी यांची कन्या शकुंतला ही ( वय १३–१४ ) दोन्हीं डोळ्यांनीं लहानपणापासून आंधळी असून तिला बाबांच्या भजनांची फार आवड आहे. ती स्वतः गोड गोड भजनें म्हणते. तिला नेण्या–आणण्याचें काम कधीं वडील, कधीं आई करतात. तिची थोरली बहीण पायानें अधू असून घरांतल्या घरांत साईबाबांची भक्ति परोपरीनें करते. ही सर्व मंडळी बाबांची उपासक व धार्मिक वृत्तीची आहेत. गेल्या ३।४ महिन्यापासून त्यांच्या वडील मुलाच्या लग्नाचें घाटत होतें. माझ्याजवळ ते हा विषय काढून एकदां म्हणाले, 'आमच्या शामचें लग्न करायचें आहे; परंतु आमच्या घरांत ही तऱ्हा! मुलगी द्यायला कोणी धजत नाहींत.' तसें घडत असें हें मात्र खरें. ८।१० मुली सांगून आल्या परंतु मागाहून पत्रिका जमत नाहीं, यंदा कर्तव्य नाहीं असल्या सबबी पुढें यायच्या!

मी त्यांना म्हटलें, 'तुमची साईबाबांवर संपूर्ण श्रद्धा आहे ना? मग तुम्हांला काळजी करण्याचें कारण नाहीं! बाबा पाहून घेतील! तुम्हीं त्यांच्या भक्तींत खंड पडूं देऊं नका. एक दिवस भाग्याचा उजाडेल व तुमची इच्छा पूर्ण होईल!'

योगायोग कसा पहा! त्यांच्या शाळेचे नागोठण्याचे श्री. गोवर्धन अनंत तडके ( हल्लीं मु. कोयना ) पुण्यास आहेत. त्यांच्या परिचयाचे एक गृहस्थ श्री. पिंपळखरे यांच्याकडे स्थळासंबंधीं चौकशी केली. त्याप्रमाणें सोहनी यांस सर्व हकिगत कळविण्यांत आली. दोघांच्या भेटीगांठी झाल्या. अट बीट कांहीं नाहीं. वेळ जुळून आली आणि शामचें लग्न बाबांच्या कृपेनें नुकतेंच ( ता. ८।६।६३ ) रोजीं थाटांत घडून आलें. जेवणावळीच्या वेळीं पावसाची भीति फार वाटूं लागली. मी त्यावेळीं हजर होतों. त्या मंडळीस धीर देऊन बाबा कोणतेंही संकट येऊं देणार नाहींत, आणि तुमचा विरस होऊं देणार नाहींत, असें सांगितलें. आणि खरोखर लग्न समारंभ निर्विघ्नपणें पार पडला. सर्व लग्न–सोहळा व्यवस्थित पार पडल्यानंतर पावसानें एक तासभर झोड उठवून दिली!

बाबा म्हणतात—'जो मजलागीं अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्भजन। माझें चिंतन, माझें स्मरण! तयाचें उद्धारण ब्रीद माझें॥

कु. शकुंतला हिला आतां थोडथोडें दिसूं लागलें आहे. उपचार चालू असतात. परंतु त्यांत बाबांच्या कृपेचीही भर पडत आहे असें वाटतें.

× × ×

**बाबा नवसास पावले—**

श्री. विजय सखाराम मसदेकर, आर्थररोड, बूटवाला बिल्डींग, दुसरा मजला, खो. नं. ३८, मुंबई नं. ११ हे लिहितात कीं, आमच्या मॉडर्न मिलमधील ऑफिसर श्री. एम्. व्ही. रांगणेकर आणि एम्. अनंतराव इंजिनियर हे 'श्री साईलीला' मासिकाचे एकमेव सभासद आहेत. ते प्रत्येक महिन्यांतील चालू अंक पोष्टांतून

आल्यानंतर मागील अंक ते आम्हां मित्र-मंडळींना वाचावयास देत असतात. आणि आम्हीही सारे तो अंक मोठ्या आवडीनें वाचतों. आणि अशाच प्रकारचा 'साईबाबा' यांच्या बद्दलचा जो मला एक सत्य अनुभव आला तो मी खाली देत आहे. गेले सहा महिने देईन-देईन म्हणून पुष्कळ महिने लोटल्यावर आज तो वृत्तांत आपल्याकडे पाठवित आहे. त्याचा आपण स्वीकार कराल अशी आशा बाळगून मी खालीं माझ्या वृत्तांतास प्रारंभ करतो.

माझा हा 'श्रीसाईबाबा' यांच्याबद्दलचा जो अनुभव आहे तो दहा वर्षी-पूर्वीचा आहे. आम्ही एकंदर तीन भावंडें आहोंत. दोन भाऊ व एक बहीण. वडील भावाचें लग्न होऊन पांच-सहा वर्षें लोटलीं आहेत. तरीसुद्धां अद्यापपर्यंत त्यांना कांहींहि मूलबाळ नव्हतें. त्यामुळें मी व माझ्या मागची बहीण-आम्हीं फार काळजींत असूं. बहीण लग्नाची झाली म्हणून तिच्या लग्नाच्या खटपटींत असतांना ती अशा वेळींसुद्धां आम्हांला सांगत असे कीं, 'एवढ्यांत माझें लग्न वगैरे करण्याच्या भानगडींत तुम्हीं पडूं नका; जेव्हां दादास मूलबाळ होईल त्याचवेळीं माझें लग्न करा! अशाच प्रकारें दिवसांमागून दिवस जात होते.

आमच्या शेजारींच एक सुर्वे नांवाचें कुटुंब रहात होतें. त्यांना दुसऱ्यांदा मुलगा झाल्यानंतर एके दिवशीं सहज रोजच्याप्रमाणें त्यांच्या खोलींत गेल्यावर त्यांची बहीण मला म्हणाली-काय रे विजय, हें पहा आमच्या दादास मुलगा झाला आणि तुझ्या दादास मात्र अजून कांहींच नाहीं. अरे! तुला काका म्हणून हांक तरी कोण मारणार?

ते तिचे भावनात्मक उद्‌गार ऐकून मी फार नाराज झालों. मला मनांतून फारच दुःख झालें. परंतु ते दुसऱ्या कोणासच न दाखवितां मी तसाच उदास मनानें खोलींत जाऊन खुर्चीवर विचार करीत बसलों. त्या दिवशीं मी कामावरसुद्धां गेलों नाहीं. सबंध दिवस विचारानें डोकें अगदीं सून्न झालें होतें.

असाच विचार करीत बसलों असतां माझ्या मनांत एक विचार आला. मला त्यावेळीं श्रीसाईबाबांची आठवण झाली आणि वाटलें कीं, शिरडीला जाऊन साईबाबांचे तरी दर्शन करून यावें. दादा संध्याकाळीं कामावरून घरीं आल्यानंतर मी माझा विचार त्याला सांगितला. एवढ्या लांब एकटेंच जाण्याचा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळें दादा कांहीं मला शिरडीला एकटेच जाण्याची संमती देईना. आणि दादालाही मी माझा शिरडीस जाण्याचा मुख्य उद्देश (हेतू) मात्र कळूं दिला नव्हता. दादा मला म्हणाले तुला जर का दुसरीकडे बाहेरगांवीं जावयाचेंच असेल तर तूं तुझ्या मावशीकडे पुण्याला जावून ये. मी सुद्धां त्यावेळीं त्याच्या म्हणण्याला होकार देवून कशी-बशी वेळ मारून नेली. मी मात्र शिरडीला जाऊन श्रीसाईबाबांचें दर्शन घेऊन येण्याचा माझ्या मनाशीं अगदीं पक्का निश्चय केला होता. आणि दुसऱ्या दिवशीं पुण्यास जातों असें सर्वांना सांगून मी मात्र शिरडीस जाण्याच्या तयारीला लागलों. माझ्या मित्र-मंडळींना

त्याचप्रमाणें घरांतील सर्व माणसांना मी उद्यां पुण्यास मावशीकडे जाऊन येतों असें सांगितलें.

जाते वेळीं दुसऱ्या दिवशीं माझ्या धाकट्या बहिणीस,सांगितलें, "गंगू, मी आज शिरडीस जात आहे. दादांना मात्र मी गेल्याशिवाय सांगूं नकोस. जर कां तूं दादांना मी जाण्याच्या अगोदर सांगितलेंस तर मी तुझ्याबरोबर केव्हांच बोलणार नाहीं." आणि असें सांगतेवेळीं तिच्या डोळ्यांतील गंगा–जमुना गालावरून खालीं ओघरूं लागल्या. त्यावेळीं ती येवढेंच म्हणाली—" बरं, याबद्दल तूं मुळींच चिंता करूं नकोस. खुशाल जावून ये शिरडीला."

शिरडीला पोहोंचल्यानंतर बाबांच्या समाधीवर हात ठेवून मी त्यांच्याजवळ एवढेंच मागितलें कीं, बाबा आमच्या दादांना मुलगा किंवा मुलगी दे. आणि जेव्हां दादांना मुलगा अगर मुलगी होईल त्याच्या १२ व्या दिवशीं मी तुमच्या समाधीजवळ येवून तुमची भेट घेईन.

नंतर जवळ–जवळ एक वर्षानें आमच्या दादांना जेव्हां पहिली मुलगी झाली तेव्हां आम्ही तिचे नांव रजनी असें ठेविलें, आणि मागें म्हटल्याप्रमाणें मी मुलगी झाल्यानंतर १२ व्या दिवशीं जेव्हां शिरडीला बाबांच्या दर्शनास गेलों तेव्हां तेथें माझे चार दिवस फार सुखांत गेले. बरेच दिवापूर्वी विचारांनीं थकून गेलेलें मन खरोखरच आनंदानें भरून गेलें.

मी पुण्यास जाणार म्हणून माझ्या जवळ दादानें खर्चासाठीं २० रुपये दिले होते. मला बाबांना नैवेद्य घेण्याची फार इच्छा होती. पण पैसे अपुरें असल्यामुळें मीं नैवेद्य घेवूं शकत नव्हतो. बाबांच्या बाजूच्या खोलींत सत्यनारायणाची पुजा चालली होती. त्यामुळें त्या दिवशीं कुठेंच जावूं शकलों नाहीं. व जेथें पुजा चालली होती तेथें जावून बसलों असतां थोड्याच वेळानें एक पुजारी भटजीकाकांजवळ येवून सांगूं लागला आज पूजेसाठीं बाबांजवळ लाडवाचा प्रसाद कुठेंच दिसत नाहीं तो? तो असें म्हणताच मी तेथून लगेच उठलों व दुकानांतून पांच लाडू घेवून ते भटजी-काकाजवळ दिलें. भटजीही आश्चर्यानें माझ्याकडे पाहूत मनांत हंसलें व तेथील पुजाऱ्याला भटजीकाका म्हणाले, अहो, पुजारी, हे पहा साईबाबांनी आपल्या प्रसादाला लाडू आणलेंच. त्यावेळीं मलाही मनांतुन फार फार आनंद झाला.

मुंबईहून निघते वेळीं मी सर्वांना पुण्यास जात आहे असें सांगितलें असतांना मी बाबांना सांगूं लागलों, बाबा! मी शिरडीला आलों हें सर्वांना कळणार तरी कसें!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ४ वाजतां उठून आंघोळ वगैरे करून साईबाबांच्या समाधिचे दर्शन घेवून एस्. टी. स्टँडवर असतानांच आमच्या मिलचे इंजिनियर एम्. अनंतराव साहेब आणि त्याचें कुटुंब माझ्या समोर दत्त म्हणून उभें राहिलें. काय योगा–योग म्हणायचा हा!!

× × ×

## हरवलेलें पाकीट मिळालें—

श्री. प्रल्हाद वामनराव कासार केअरऑफ विनायकराव कासार, बी. एस्. सी. बी. ए., मु. साक्री, जि. धुळें हे लिहितात कीं, मी व माझे मेव्हणे श्री. विनायकराव कासार साक्रीकर असें आम्हीं साकोरी येथें दर्शनास टांग्यातून गेलों व लागलेंच शिरडी येथें परत आलो. प्रवासांत कोठेंतरी माझे पैशांचे पॉकीट हरवलें. तें शिरडीस येत असतांना लक्षांत आलें. माझे मेव्हणे यांनीं साईबाबांना मनांतून पाकिट सांपडावें म्हणून प्रार्थना केली व २ रुपयांचा प्रसाद कबूल केला. टांग्यातून खोलीवर परत आलो तोपर्यंत पाकिट सांपडण्याची आशा सुटली होती परंतु साईकृपेनें इमारतीच्या खालीं येण्याची बुद्धी झाली. तिकडून एक छोटा मुलगा आम्हांस बोलावण्यास आला. त्याचेबरोबर आम्हीं त्याचें आईकडे गेलों व त्या मुलाच्या आईनें 'तुमचें पॉकीट एका टांगेवाल्याजवळ दिलें आहे' असें सांगितलें व त्याच्याशीं गांठ घालून दिली. त्या टांगेवाल्यास तिनें माझे पॉकिट देण्यास सांगितलें. येणेप्रमाणें टांगेवाल्यानें पॉकीट मला परत केले. ज्या बाईनें आम्हांस बोलावून घेतलें व सांगितलें ती कोण, कुठली याची आम्हांस कांहींहि कल्पना नव्हती. परंतु पॉकिट पैशांसह परत मिळाले हा साईबाबांचा कृपाप्रसादच नव्हे काय ?

× × ×

## बाबानीं संकटमुक्त केलें !

श्री. अनील पंडित, १३ खाटीपुरा रोड, इंदूर ( एम्. पी. ) हे साईबाबांसंबंधीं आपला अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात. मी बाबांची सेवा गेल्या दोनच वर्षांपासून करीत आहे पण ह्या दोन वर्षांत मला निरनिराळे अनुभव येत गेले व येत आहेत.

ह्या वर्षी माझी मती गुंग करणारा विलक्षण अनुभव माझ्या वांट्यास आला. अर्थात बाबांच्या कृपेनें शेवट गोड झाला हें सांगायला नकोच.

यंदा इन्दूरला फ्लूची भयंकर साथ होती. ज्याला पहावें त्याला फ्लू झालेला त्यातून आमचे घर सुटेल असे कचीतच होईल. आमच्या घरी फ्लूनें सर्वचजण आजारी पडले. मी देखील त्यांत होतो. मी बी. एस्. सी.चा विद्यार्थी होतों त्यावेळेस आमची वार्षिक प्रॅक्टीकल्स परीक्षा फेब्रुवारीमधें होणार होती परीक्षेच्या कांहीं दिवस अगोदरच मला ताप आला होता. आजारीपणांत शरीराला अतिशय थकवा आला होता. परीक्षेला बसलें तर कसें जाईल ह्याची सारखी काळजी लागून राहिलो होती. योग्यतो औषधोपचार चालूच होता पण पाहिजे तसा गुण येत नव्हता. पण परिक्षेला बसल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण वर्षाचें नुकसान होणार. काळजी–काळजीनेंच अर्धा धीर सुटत होता. उत्साह येणार तरी कसा ? शेवटीं बाबांचीच करुणा भाकली. बाबांनाच म्हणालों कीं, एवढें धैर्य द्या कीं मी परीक्षेला बसूं शकेन. मला ह्या वेळेस तुमच्या मदतीची जरूरी आहे. पास होणें न होणें हें भाग्याचें खेळ आहेत. वर्षभर

अभ्यासाचे जे कष्ट केले त्यांचेंच फळ मिळूं द्या. तुम्हींच तारणारे. आई आपल्या मुलाला दूर फेकते कां ?

बाबांची जी मी प्रार्थना केली ती अत्यंत तळमळीनें व अंतःकरणापासून केली. बाबांचीच कृपा म्हणा ज्या दिवशीं माझें प्रॅक्टीकल्स होते त्या दिवशीं मला हुषारी तर वाटलीच पण काम पण छान झालें. प्रॅक्टीकल्स तर उत्तम रीतीनें पार पडलें. आतां एक महिन्यानें लेखी परीक्षा होती. आजारीपणामुळें मन अतिशय उदास झाले होतें. बाबांजवळ प्रार्थना चालूच होती. परीक्षा कशी तरी पार पडली. नंतर रिझल्टच्या आठ दहा दिवस अगोदर मला एक स्वप्न पडलें. त्यांत मी सेकन्ड डिव्हीजनमध्यें पास झालों आहे असें दिसलें. विश्वास नाहीं बसणार असेंच स्वप्न होतें ! नंतर लगेच कांहीं दिवसांनीं मला पुन्हां एक स्वप्न पडलें. त्यांत मला स्वतः बाबांनीं शिरडी फिरवून आणली व शिरडींतील प्रत्येक गोष्ट बाबा मला समजावीत होते; असें दिसले. परंतु शिरडी मी पाहिली नसल्यानें बाबांनीं ज्या इमारती व जागा दाखविल्या त्या हुबेहुब जरी दिसल्या नाहींत तरी पुसटशी कल्पना येईल एवढे मात्र स्वप्नांत दिसले. सकाळीं उठतांक्षणी मनाला एक वेगळाच आनंद वाटत होता. व स्वप्नांत बाबांनीं प्रत्यक्ष दर्शन दिल्यानें किती समाधान व सुखाचा अनुभव वांट्यास येतो हें साई भक्तांना सांगावयास नकोच.

बाबांनीं स्वप्नांत सूचना दिल्याप्रमाणें मी सेकन्ड डिव्हीजनमध्यें पास झालों. ही केवळ बाबांचीच कृपा. पाषाणाला देखील पाझर फुटला असता अशी बरची स्थिती झाली होती. त्यांतून बी. एस. सी ची परीक्षा द्यावयाची होती. मोठा कठीण प्रसंग होता.

बाबा हे प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार आहेत हें कोणालाही अमान्य करून चालणार नाहीं. मनुष्यानें जर साईनाथांवर विश्वास ठेविला तर माझ्यासारख्या भक्तांवर ओढविलेल्या संकटातून पुष्कळांची सुटका होऊं शकते. त्यांच्याविषयीं तशीच श्रद्धा, निष्ठा व अंतःकरणाची तळमळ मात्र पाहिजे, हें सांगणें नकोच.

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘लायसॉफ तेल’ वापरा'
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

# संत तुकोबा आणि त्यांचे छळक

**साधूंचा छळ सर्वकाळीं दुष्टांकडून होत आलेला आहे. संत तुकारामाचा छळ करणारे थोडेथोडके का होते? परंतु तुकोबांनीं त्यांच्याबद्दल कोणती वृत्ती बाळगिली व त्या छळकांचें काय झालें?**

तुकारामाचीं पूर्वींचीं 'वेडा,' 'पिसा,' 'खुळा,' हीं विशेषणें जाऊन आतां लोक त्याला 'साधु,' 'संत,' 'भक्त' म्हणून ओळखूं लागले याचा त्या वेळच्या कित्येक कर्मठ ब्राह्मणांना आणि आडमुठ्या लोकांना राग आला आणि ते तुकारामाची आतां निराळ्या प्रकारें निंदा करून त्याचा छळ करूं लागले. लोक इतके त्याच्या भजनीं लागतात, पण तो सोंगाड्या आहे, तो 'शूद्र' आहे, तो विद्वान नाहीं, त्याला देव कुठला भेटायला? त्याचें कवित्व तें काय? कुठलें तरी भूत त्याच्या मानगुटीला बसलें आहे, त्यानें अधर्म माजविला आहे, तो जातिभेद मानीत नाहीं, वर्णसंकराचा उपदेश करतो, उपदेश करणें हा ब्राह्मणाचा धर्म, 'शूद्राला' मुळीं उपदेश करण्याचा अधिकारच नाहीं...वगैरे वगैरे बोलून स्वार्थसाधु आणि ढोंगी लोक त्याचा कांटा देहू गांवांतून काढण्याच्या उद्योगाला लागले! यांत सालोमालो, मंबाजी बोवा व रामेश्वर भट्ट हे प्रमुख होते.

सालोमालो हा त्या वेळचा एक विद्वान् होता. तुकारामाच्या कवित्वाला लोक भाळतात, तेव्हां आपणही कवित्व करून तुकारामासारखीच अभंगरचना करावी म्हणून तो तुकारामाच्या अभंगांसारखेच अभंग रचून शेवटीं 'तुका म्हणे'च्या ऐवजीं 'सालोमालो म्हणे' असें दडपून देई आणि लोकांना सांगे कीं, तुकाराम माझेच अभंग चोरून आपले म्हणून गावून दाखवितो!

मंबाजीबोवा हा एक गोसावी होता. तो देहूंतील विठोबाच्या देवालयाच्या शेजारींच राहत असे. तुकोबांच्या कीर्तनाला अलोट गर्दी ज़मे ती याच्यानें पाहवत नसे. एकदां तुकारामाच्या घरची म्हैस या विठ्ठलमंदिराला लागूनच असलेल्या मंबाजीच्या बागेंत शिरली. तेव्हां मंबाजीनें तुकारामाला आणि त्याच्या बायकोला यथेच्छ शिव्या दिल्या. तुकारामाची बायको उगी राहणारी नव्हती. पण तुकोबा शांतीचे सागर. ते त्याला उलट एक शब्दही बोलले नाहींत.

पुढें मंबाजीनें हें निमित्त करून आपल्या बागेला कांटेरी कुंपण घातले आणि तें देवळाच्या प्रदक्षिणेच्या वाटेला नेऊन भिडविलें. तेव्हां लोकांना प्रदक्षिणेला अडचण पडूं लागली. मंबाजीची कल्पना कीं यामुळें तरी लोक तुकारामाच्या कीर्तनाला येण्याचे बंद होतील! पण लोक कसचे ऐकतात? ते यायचे तसे आलेच. तुकोबांनीं हा कुंपणाचा प्रकार पाहिला तेव्हां ते पुढें झाले आणि त्यांनीं त्या कुंपणाचे एक 'शिरें' काढून वाट

मोकळी केली. मंबाजी जवळच होता. तो आपलें कुंपण तुकारामानें मोडलें म्हणून रागाने बेहोष झाला आणि लगोलग येऊन त्यानें तेंच शिरें घेऊन तुकारामाच्या पाठीचें धिरडें केलें! आणि तोंडानें अद्वातद्वा बोलून त्याला निथून घालवून दिलें.

त्या दिवशीं एकादशी होती. नित्याप्रमाणें तुकारामाचें कीर्तन देवळांत व्हावयाचें होतें. मंबाजी दुष्ट होता तरी भाविक होता. देवळांत कीर्तन असलें म्हणजे नित्यनियमानें तो यावयाचाच. पण आज सकाळच्या गोष्टीनें त्याची त्यालाच लाज वाटून तो आला नाहीं. तुकारामाला हें समजलें तेव्हां तो आपणहूनच मंबाजीच्या घरीं गेला, आणि मंबाजी झोंपला होता तिथें जाऊन त्याचें अंग रगडूं लागला!

'माझ्या हातून आज अपराध झाला. तुमची चूक नाहीं. तुम्हीं मला मारलेंत तें ठीकच केलेंत. तुम्हांला माझ्यामुळेंच कष्ट झाले. तुमचें अंग दुखत असेल मी रगडतों, पण आपण आज कीर्तनाला आलें पाहिजे. आज हरिजागराचा दिवस. मनांत कांहीं ठेवूं नका, चलाच,' असा आग्रह करून त्यानें मंबाजीला आणून कीर्तनांत बसविलें!

मंबाजीलाही पुढें पश्चात्ताप झाला, आणि तुकाराम सामान्य मनुष्य नाहीं. दांभिक तर नाहींच नाहीं. अशी त्याची खात्री झाली आणि तो पुढें त्याचा शिष्य झाला!

तुकाराम बोवांचा तिसरा प्रसिद्ध छळक रामेश्वर भट्ट हा होय. हा पुण्याजवळच्या वाघोली गांवचा राहणारा. हा मोठा कर्मठ पंडित होता. आपल्या जातीचा दुरभिमान त्याच्या रोमारोमांत भिनला होता. तुकाराम जातीनें 'शूद्र.' असून कीर्तन करतो आणि ब्राह्मणांसमुद्धां उपदेश करतो हा त्याला मोठा अधर्म वाटे! कीर्तनांत वेदांचें वर्णन करतो, आणि पुष्कळसे ब्राह्मणहि त्याच्या पायांवर डोकें ठेवितात हें पाहून त्याच्या अंगाची लाही होई.

त्यावेळीं प्रत्येक गांवाची व्यवस्था ग्रामपंचायतीकडे असे. परक्या माणसाला गांवांत थारा देणें अगर गांवांतल्या एखाद्या माणसाची तेथून उठावणी करणें या गोष्टी गांवच्या अधिकाऱ्यांच्या हातीं असत. रामेश्वर भट्टानें या अधिकाऱ्यांकडे संधान बांधलें आणि त्यांची अशी समजूत करून दिली कीं हा 'तुक्या' शूद्र वेदाक्षरें बोलतो ब्राह्मणांची निंदा करतो, टाळ कुटून लोकांना भलताच उपदेश करतो त्यामुळें अधर्म माजतो आहे. तेव्हां याचा बंदोबस्त करून त्याला गांवाबाहेर घालवून द्या; नाहीं तर काय अनर्थ होईल सांगवत नाहीं! हल्लींच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'तुकाराम 'जाती–जातींत वैषम्य' माजविणारा असल्यामुळें अनिष्ट मनुष्य आहे, तेव्हां त्याला गांवांतून हाकलून द्या' असें टुमणें रामेश्वर भट्टानें गांवच्या अधिकाऱ्यांच्या मागें लावलें. तुकारामबोवांना हें समजलें तेव्हां ते म्हणाले:–'बरें आहे. चला जाऊं विठ्ठलाचा शोध करीत आणि तो सांपडेल तिथें राहूं.'

'काय खावें आतां? कोणी कडे जावें? ॥ गांवांत राहावें कोण्या बळें? ॥ १ ॥ कोपला पाटील गांवींचे हे लोक। आतां घाली भीक

कोण मज ? ॥ २ ॥ आतां 'येणें चवी सांडिली' म्हणती । निवाडा करिती दिवाणांत ॥ ३ ॥ भल्या लोकीं यांस सांगितली मात । केला माझा घात दुर्बळाचा ॥ ४ ॥ तुका म्हणे यांचा संग नव्हे भला । शोधींत विठ्ठला जाऊं चला ॥ ५ ॥

पुढें या रामेश्वर भट्टालाच कांहीं व्याधि होऊन तो आळंदी येथें ज्ञानेश्वरांच्या समाधीपाशीं सेवेसाठीं राहिला असतां त्याला तिथें दृष्टांत झाला कीं तूं तुकारामबोवांचा छळ केलास त्याचें हें फळ; तेव्हां त्यालाच शरण जा, म्हणजे रोगमुक्त होशील, त्यामुळें रामेश्वरभट्ट तुकोबांना शरण गेला तेव्हां त्याची व्याधि नाहींशी झाली.

प्रथम तुकारामाचा गैरसमजुतीनें छळ करून मागाहून पश्चात्तापपूर्वक त्याचें शिष्यत्व पतकरलेल्या माणसांच्या आणखीहि कांहीं गोष्टी आहेत, त्यांत लोहगांवच्या शिवा कासाराच्या बायकोची गोष्ट सांगण्यासारखी आहे.

शिवा कासाराला तुकारामाच्या कीर्तनाचें वेडच लागलें होतें. तेव्हां तो तुकारामाचें कीर्तन असलें कीं रात्रीं बेरात्री लोहगांवाहून देहूला जावयाचाच. तुकारामाच्या कीर्तनांत मुख्य निरूपण असावयाचें तें 'संसाराच्या असारपणा' विषयीं.

" नव्हे तुझा हा परिवार । द्रव्य दारा क्षणभंगुर ॥
अंतकाळींचा सोयरा । तुका म्हणे विठो धरा ॥ १ ॥ "
" देह जाईल जाईल । यासी काळ वा खाईल ॥
अजुनी तरी होईं जागा । तुका म्हणे पुढें दगा ॥ २ ॥ "
" भवसागर तरितां । कांरे करीतसां चिंता ॥
पैल उभा दाता । कटी कर ठेवूनियां ॥
त्याचे पायीं घाला मिठी । मोल नेघे जगजेठी ॥ ३ ॥ "

अशाच प्रकारचा उपदेश त्यांचा नेहमीं असावयाचा. या उपदेशानें शिवाचें संसारांतून मन उठलें, आणि संसाराकडे दुर्लक्ष होऊं लागल्यामुळें बायकामुलांची उपासमार होऊं लागली.

शिवाच्या बायकोनें विचार केला कीं आपल्या नवऱ्याला आडमार्गाला लावणाऱ्या त्या तुकारामाला एकदां चांगला तिंबून काढावा म्हणून तिनें तुकारामाला आपल्या घरीं बोलाविलें आणि त्याला स्नान घालण्याच्या निमित्तानें त्याच्या अंगावर आधणाचें पाणी आणून ओतलें ! मग–काय विचारतां ? तुकारामाचें सर्व अंग पोळून निघालें. तो विव्हळूं लागला. पण त्याच्या तोंडून त्या माउलीविषयीं मात्र एक शब्दही वांकडा निघाला नाहीं ! त्यानें काय धांवा करावयाचा तो देवाचा केला.

———

# आदर्श गुरुमूर्ति कोण ?

—संत विनोबा

**साधकानें निराश कधींहि होऊं नये. 'पुन्हां यत्न करून पहा' हा बाणा त्यानें सदैव अंगिकारिला पाहिजे. स्थितप्रज्ञ तोच आदर्श गुरु होऊं शकतो. त्याचीं लक्षणें ध्यानीं आणून अशा पुरुषाला शरण जाणें, तद्रूप होणें, ते गुण अंगीं बाणविण्याचा सतत प्रयत्न करणें हें साधकाचें मुख्य कर्तव्य आहे.**

जीवनाचे सिद्धान्त अंमलांत आणण्याची जी हातोटी किंवा युक्ति, तिलाच योग म्हणतात. सांख्य म्हणजे सिद्धान्त किंवा शास्त्र, आणि योग म्हणजे कला. "**योगियां साधली जीवन-कला**" म्हणून ज्ञानदेव ग्वाही देतच आहेत. गीता सांख्य व योग, शास्त्र व कला, दोहोंनीं परिपूर्ण आहे. शास्त्र व कला दोहोंनीं मिळून जीवन-सौंदर्य खुलतें. शास्त्र हवेंत रहावयाचें. संगीताचें शास्त्र समजलें तरी गळ्यांतून संगीत प्रकट करण्याची कला साधल्याशिवाय नादब्रह्म सजावयाचें नाहीं. ह्यासाठीं भगवंतांनीं सिद्धान्तांबरोबर त्यांचा विनियोग शिकविणारी कलाहि सांगितली आहे. कोणती बरें ही कला देह तुच्छ मानून आत्म्याची अमरताव अखंडता लक्षांत आणून स्वधर्म आचरण्याची कोणती ही कला ?

कर्म करणारांची दुहेरी वृत्ति असते. आम्हीं कर्म केलें तर त्या कर्माचें फळ आम्ही अवश्य चाखणार, आमचा तो अधिकार आहे, ही एक वृत्ति आणि उलट पक्षीं आम्हांला फळ चाखायला मिळणार नसेल तर आम्ही कर्म करीतच नाहीं, ही दुसरी वृत्ति. गीता तिसरीच वृत्ति सांगते. गीता म्हणते, "कर्म तर कराच, पण फळाचा अधिकार राखूं नका." कर्म करणाराला फळाचा अधिकार आहे. पण तो तुमचा अधिकार स्वेच्छेनें सोडून द्या. रजोगुण म्हणतो, घेईन तर फळासकट घेईन. तमोगुण म्हणतो, टाकीन तर कर्मासकट टाकीन. दोन्ही एकमेकांचे भाऊच आहेत. दोहोंच्या वर जाऊन शुद्ध तत्त्वगुणी व्हा. कर्म करून फळ सोडा, आणि फळ सोडून कर्म करा. पुढें किंवा मागें कुठेंच फलाशा ठेवूं नका.

**फलत्याग ही कलाच**

फलाशा ठेवूं नका असें सांगतांना कर्म उत्कृष्ट झालें पाहिजे असें गीता बजावीत आहे. सकाम पुरुषाच्या कर्मापेक्षां निष्काम पुरुषाचें कर्म अधिक चांगलें झालें पाहिजे, ही अपेक्षा योग्यच आहे. कारण सकाम पुरुष फलासक्त असल्यामुळें फळाविषयींच्या स्वप्न-चिंतनांत त्याचा थोडाबहुत कालक्षय आणि शक्तिक्षय होणारच. परंतु फलेच्छारहित पुरुषाचा प्रत्येक क्षण आणि

सर्व शक्ति कर्मांतच उपयोजिली जाणार. नदीला सुटी नाहीं. वाऱ्याला विसांवा नाहीं. सूर्याला सदैव जळणेंच माहीत. त्याप्रमाणें निष्काम–कर्त्याला सतत सेवाकर्मच माहीत. अशा निरंतर कर्मरत असणाऱ्या पुरुषाचें कर्म उत्कृष्ट होणार नाहीं तर कोणाचें होणार ? शिवाय चित्ताचें समत्व हा एक मोठाच कुशल गुण आहे. आणि तो तर निष्काम पुरुषाच्या मालकी हक्काचा आहे. एखादें अगदीं बाह्य कारागिरीचें काम घेतलें तरी त्यांतहि हस्तकौशल्याबरोबर चित्ताच्या समत्वाची जोड असली तर काम अधिक सुंदर होणार ही गोष्ट उघड आहे. बरें, सकाम आणि निष्काम पुरुषाच्या कर्म-दृष्टींत जो फरक आहे तोहि निष्काम पुरुषाच्या कर्माला अधिक अनुकूल आहे. सकाम पुरुष कर्माकडे स्वार्थी दृष्टीनें पाहत असतो. माझेंच कर्म आणि माझेंच फळ. त्यामुळें कर्मांत थोडें दुर्लक्ष झालें तरी त्याला तो नैतिक दोष वाटत नाहीं. फार तर व्यावहारिक दोष वाटतो. पण निष्काम पुरुषाची स्वकर्माविषयीं नैतिक कर्तव्य–बुद्धि असल्यामुळें त्यांत यत्किंचित् उणीव राहूं नये, याविषयीं तो तीव्रतेनें जपत असतो. म्हणूनहि त्याचें कर्म अधिक निर्दोष राहील. कसेंहि पहा. फलत्याग हें अत्यंत कुशल व यशस्वी तत्त्व ठरतें. म्हणून फलत्याग हा योग किंवा जीवनाची कला म्हणावयाची.

## कार्यांतील सात्वीक आनंद

निष्काम कर्माची गोष्ट बाजूला ठेवली तरी एरव्ही सुद्धां प्रत्यक्ष कर्मांत जो आनंद आहे व तो त्याच्या फळांत नाहीं. स्वकर्म करीत असतांना त्यांत जी एक प्रकारची तन्मयता आहे, असते तो आनंदाचा झरा आहे. चित्रकाराला म्हणा, ‘ चित्र काढूं नको. चित्र न काढण्याबद्दल तुला लागेल तो पैसा देऊं.’ तो ऐकणार नाहीं. शेतकऱ्याला म्हणा, ‘ तूं शेतांत जाऊं नको, गुरें चारूं नको, मोट हाकूं नको. आम्हीं तुला लागेल तेवढें धान्य देऊं.’ तो जर हाडाचा शेतकरी असेल त्याला हा सौदा पटणार नाहीं. शेतकरी सकाळीं शेतांत जातो. सूर्यनारायण त्याचें स्वागत करतो. पांखरें त्याच्यासाठीं गाणीं गातात. गाईवांसरें सभोंवतीं असतात. तो कौतुकानें त्यांना गोंजारतो. लावलेली झाडें बघतो. ह्या सर्व कार्यांत एक सात्विक आनंद आहे. हा आनंद हेंच त्या कामाचें मुख्य आणि खरें फळ आहे. त्या मानानें त्याचें बाह्य फळ अगदींच गौण आहे.

गीता जेव्हां मनुष्याची कर्म–फलावरून दृष्टि खेंचून घेते तेव्हां ती ह्या युक्तीनें त्याची कर्मांतील तन्मयता शतगुणित करते. फलनिरपेक्ष पुरुषाची कर्मांतील तन्मयता समाधीच्या कोटीची असते. त्यामुळें त्याचा आनंद इतरांहून शतगुणित असतो. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे निष्काम कर्म हें स्वतःच महान् फळ आहे हें लक्षांत येतें. ‘ झाडाला फळें लागतात; परंतु फळाला आणखी कोणतें फळ लागणार ?’ असें ज्ञानदेवांनी ठीकच विचारलें आहे. ह्या देहाच्या वृक्षाला निष्काम स्वधर्माचरणासारखें सुंदर फळ लागल्यावर आणखी कोणत्या फळाची आणि कां अपेक्षा राखावी ? शेतकऱ्यानें शेतांत गहूं पिक वून, ते गहूं विकून, ज्वारीची भाकर कां खावी ? केळ्यांचा रसाळ मळा करून, तीं

केळीं विकून, मिरच्या कां खाव्या? अरे, तीं केळींच खा. पण लोकमताला हें कबूल नाहीं. केळीं खाण्याचें भाग्य असून लोक मिरच्याच खात असतील. गीता सांगते असें करूं नका. कर्मच खा. कर्मच प्या. कर्मच पचवा. कर्म करणें यांतच सारें कांहीं आलें. मुलगा खेळण्याच्या आनंदासाठीं खेळतो. त्यामुळें व्यायामाचें फळ त्याला सहजच मिळतें. परंतु त्या फळाकडे त्याचें लक्ष नसतें. त्याचा सर्व आनंद त्या खेळांत असतो.

## हेंच का भक्तीचें फळ ?

संतांनीं आपल्या जीवनांत हें दाखविलें आहे. तुकारामांची भक्ति पाहून शिवाजी-महाराजांना त्यांच्याविषयीं फार आदर वाटे. एकदां त्यांनीं तुकारामांकडे पालखी वगैरे पाठवून त्यांचें स्वागत आरंभिलें. तुकारामांना ही आपल्या स्वागताची तयारी पाहून तीव्र दुःख झालें. त्यांनीं आपल्या मनांत विचार केला, 'हें का माझ्या भक्तीचें फळ? ह्यासाठीं का मीं देवाची भक्ति करीत असतो?' मानसन्मानाचें फळ हातांवर ठेवून देव जणूं आपणांस दूर करूं पाहत आहे असें त्यांना भासलें. तें म्हणाले—

> " जाणूनि अंतर। टाळिशील करकार।
> तुज लागली हे खोडी। पांडुरंगा बहु कुडी॥ "

देवा, ही खोड बरी नाहीं. तूं असली चिरीमिरी देऊन मला वाळवूं पहात असशील. ह्याची ब्याद दारांतून एकदांची जाऊं दे, असें मनांत म्हणत असशील. परंतु मी कचा नाहीं. मी तुझे पाय घट्ट धरून बसेन. भक्ति हा भक्ताचा स्वधर्म आणि भक्तीला अवांतर फळांचे फाटे फुटूं न देणें ही त्याची जीवनकला.

## वृत्ती तसा मार्ग

पुंडलीकाचें चरित्र फलत्यागाचा ह्याहूनहि खोल आदर्श दाखवितें. पुंडलीक आईबापांची सेवा करीत होता. त्या सेवेनें प्रसन्न होऊन पांडुरंग त्याच्या भेटीस धावून आला. परंतु पांडुरंगाच्या नादीं लागून हातांतील सेवा सोडण्याचा त्यानें इन्कार केला. ती आईबापांची सेवा म्हणजे त्याची जिव्हाळ्याची ईश्वर–भक्ति होती. एखादा मुलगा इतरांस लुटून आईबापांस सुखवित असेल; किंवा एखादा देशसेवक अन्य देशांचा द्रोह करून स्वदेशाचा उत्कर्ष इच्छीत असेल; तर त्या दोघांचीहि ती भक्ति होणार नाहीं, आसक्ति होईल. पुंडलीक अशा आसक्तींत नव्हता. देवाची मूर्ति समोर उभी राहिली तीच का तेवढा परमेश्वर? तें रूप दिसण्यापूर्वी सृष्टि का मढें होती. पुंडलीक देवाला म्हणाला, 'देवा, तूं देव माझ्या भेटीसाठीं आला आहेस हें मी ओळखलें. पण मी 'द्वि–सिद्धान्त' मानणारा आहे. तूंच देव हें मी कबूल करीत नाहीं. तूंहि देव आहेस आणि हे आईबापहि मला देव आहेत. ह्यांच्या सेवेंत मी असतांना तुझ्याकडे मला लक्ष देतां येत नाहीं ह्याबद्दल तूं मला क्षमा कर' असें म्हणून त्यानें एक वीट देवाला उभें राहण्यासाठीं पुढें मांडली. आणि स्वतः आपल्या सेवाकर्मांत मग्न झाला. तुकाराम कौतुकानें आणि विनोदानें म्हणतात:—

" कां रे प्रेमें मातलासी । उभें केलें विठ्ठलासी ।
ऐसा कैसा रे तूं धीट । मागें भिरकाविली वीट ॥ "

पुंडलिकानें वापरलेला हा 'हि-सिद्धान्त' फलत्यागाच्या युक्तीचें एक अंग आहे. फलत्यागी पुरुषाची कर्म-समाधि खोल, तशी वृत्ति व्यापक, उदार आणि सम असते. त्यामुळें तो नाना तत्त्वज्ञानांच्या जंजाळांत सांपडत नाहीं आणि स्वतःचें सोडीत नाहीं. '**नान्यदस्तीतिवादिनः**' 'हेंच आहे, दुसरें नाहींच.' असा वाद तो घालीत नाहीं. 'हेंहि आहे, आणि तेंहि आहे. पण माझ्यापुरतें हेंच आहे.' अशी त्याची नम्र आणि निश्चयी वृत्ति राहते. एकदां एका साधूकडे एक गृहस्थ गेला आणि त्याला त्यानें विचारलें, 'मोक्षासाठीं का घर सोडावेंच लागतें?' साधु म्हणाला, 'कोण म्हणतो? जनकासारख्यांनीं राजवाड्यांत राहून मोक्ष जोडला. मग तुलाच घर सोडण्याची काय जरूर?' पुढें दुसरा एक गृहस्थ आला आणि साधूला त्यानें विचारलें, 'महाराज, घर सोडल्याशिवाय मोक्ष मिळेल का हो?' साधु म्हणाला, 'कोण म्हणतो? घरांत राहून सुखासुखी मोक्ष मिळता तर शुकासारख्यांनीं गृहत्याग केला ते काय मूर्ख होते?' पुढें त्या दोघां गृहस्थांची गांठ पडली व त्यांचें भांडण जुंपलें. एक म्हणे साधूनें घर सोडायला सांगितलें. दुसरा म्हणाला घर सोडण्याची गरज नाहीं असें सांगितलें. दोघे साधूकडे आले. साधु म्हणाला, 'दोन्ही गोष्टी बरोबर आहेत. ज्याची जशी वृत्ति तसा त्याला मार्ग, आणि ज्याचा जसा प्रश्न तसें त्याला उत्तर. घर सोडण्याची गरज नाहीं हेंहि खरें; आणि घर सोडण्याची गरज आहे हेंहि खरें.' ह्याचें नांव 'हि-सिद्धान्त.'

## जीवन कलेची पूर्णिमा

पुंडलीकाच्या उदाहरणावरून फलत्याग कोणती मजल गांठणारा आहे हें दिसून येतें. तुकारामाला देव जी चिरीमिरी देऊं पाहत होता त्यापेक्षां पुंडलीकाला देऊं केलेली चिरीमिरी अतिच मोहक समजली पाहिजे. पण तिलाहि तो भुलला नाहीं. भुलता तर फशी पडता. एकदां साधन-निश्चय झाला म्हणजे शेवटपर्यंत तें साधन आचरीत राहिलें पाहिजे. मध्यंतरी देवदर्शन कां आडवें येईना, त्यासाठीं साधन सोडण्याची गरज असतां कामा नये. देह जर उरला आहे तर तो साधनेसाठींच आहे. देवदर्शन हातचेंच आहे. तें कोठें जातें? '**सर्वात्मकपण माझें हिरोनि नेतो कोण? मनीं भक्तीची आवडी**' तीच पुरी करण्यासाठीं हा जन्म आहे. '**माते संगोऽस्त्वकर्मणि**' ह्या गीतावचनाचा अर्थ निष्काम कर्म करीत असतां अकर्माची, म्हणजे अंतिम कर्म-मुक्तीची, म्हणजे मोक्षाचीहि, वासना राखूं नको. येथपर्यंत अपेक्षित आहे. वासनेंतून सुटका हाच मोक्ष. मोक्षाला वासनेची काय गरज आहे? फलत्यागानेंही मजल गांठली म्हणजे जीवनकलेची पूर्णिमा साधली.

शास्त्र सांगितलें, कला सांगितली. तरी तेवढ्यानें संपूर्ण चित्र डोळ्यापुढें उभें राहत नाहीं. शास्त्र निर्गुण आहे. कला सगुण आहे. पण सगुणहि साकार झाल्याशिवाय

व्यक्त होत नाहीं. नुसतें निर्गुण जसें हवेंत राहतें तसें निराकार सगुणाचेंहि होऊं शकतें. गुण ज्याच्या ठायीं मूर्तिमंत झाला त्या गुणींचें दर्शन हाच ह्यावर उपाय आहे. म्हणून अर्जुन म्हणतो, 'देवा, जीवनाचे मुख्य सिद्धान्त सांगितलेस. ते सिद्धान्त आचरणांत कसे आणावयाचे तीं कलाहि सांगितलीस तरी मला स्पष्ट कल्पना येत नाहीं. मला आतां चरित्र ऐकायला हवं आहे.

सांख्यनिष्ठा ज्याच्या बुद्धींत स्थिर झाली आहे, फलत्यागरूप योग ज्याच्या जीवनांत मुरला आहे, अशा पुरुषाचीं लक्षणें मला सांग, फलत्यागाची पूर्ण खोली दाखवणारा, कर्म-समाधींत मग्न झालेला, निश्चयाचा महामेरु-ज्याला स्थितप्रज्ञ म्हणावयाचें-तो बोलतो कसा, चालतो कसा, असें सर्व मला सांग. कशी असते ती मूर्ति ? ती कशी ओळखावी ? सांग देवा.'

## गीतेची आदर्श मूर्ति

ह्यासाठीं भगवंतांनीं दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं अठरा श्लोकांत स्थितप्रज्ञाचें गंभीर आणि उदात्त चरित्र वर्णिलें आहे. ह्या अठरा श्लोकांत गीतेच्या अठरा अध्यायांचें जणूं सारच सांठविलें. स्थितप्रज्ञ गीतेची आदर्शमूर्ति आहे. तो शब्दहि गीतेचा स्वतंत्र आहे. पुढें पांचव्या अध्यायांत जीवनमुक्ताचें, बाराव्यांत भक्ताचें, चौदाव्यांत गुणातीताचें, आणि अठराव्यांत ज्ञाननिष्ठाचें, असेंच वर्णन आलें आहे. पण त्याहून स्थितप्रज्ञाचें वर्णन अधिक विस्तारानें आणि खुलासेवार केलें आहे. त्यांत सिद्ध-लक्षणाबरोबर साधक-लक्षणहि दाखविलें आहे. हजारों सत्याग्रही स्त्री-पुरुष सायंप्रार्थनेमध्यें हीं लक्षणें म्हणत असतात. प्रत्येक गांवांत आणि प्रत्येक घरांत तीं पोंचवितां आलीं तर किती आनंद होईल ! पण आधीं तीं आपल्या हृदयांत ठसतील तेव्हां बाहेर सहजच पोंचतील. रोज म्हटली जाणारी वस्तु यांत्रिक झाली तर चित्तांत ठसण्याऐवजीं पुसली जायची. पण हा नित्यपाठाचा दोष नसून मनन नसल्याचा दोष आहे. नित्य-पाठाबरोबर नित्य मनन आणि नित्य आत्मपरीक्षण आवश्यक आहे.

स्थितप्रज्ञ म्हणजे स्थिर-बुद्धीचा मनुष्य, हें तर त्याचें नांवच सांगत आहे. पण संयमाशिवाय बुद्धि स्थिर कशी व्हावयाची ? म्हणून स्थितप्रज्ञ संयममूर्ति वर्णिला आहे. बुद्धि आत्मनिष्ठ, आणि अंतर्बाह्य इन्द्रियें बुद्धीच्या हातांत, हा संयमाचा अर्थ. स्थितप्रज्ञ सर्वेन्द्रियांना लगाम घालून तीं कर्मयोगांत राबवतो. इंद्रियरूप बैलांकडून तो निष्काम स्वधर्माचरणाची शेती सुव्यवस्थित करून घेतो. त्याचे प्रत्येक श्वासोच्छवास तो परमार्थांत खर्च करीत असतो.

## साधकाची युक्ति आणि भक्ति

हा इंद्रिय-संयम सोपा नाहीं. इंद्रियें अजीबात न वापरणें एक परीं सोपें होऊं शकेल. मौन, निराहार इत्यादि गोष्टी तितक्या जड नाहींत. उलट इंद्रियें स्वैर सोडणें तर सर्वांना साधतेंच आहे. परंतु कासव ज्याप्रमाणें धोक्याच्या जागी अवयव संपूर्णपणें

आंत ओढून घेतो आणि बिनधोक्याच्या जागीं ते वापरतो, त्याप्रमाणें विषयभोगांतून इंद्रियें आवरून घेणें आणि परमार्थकार्यांत त्यांचा योग्य उपयोग करणें हा संयम बिकट आहे. त्यासाठीं महान् प्रयत्न पाहिजे, ज्ञानहि पाहिजे. पण इतकेंहि करून तो सर्वदा नीट साधेलच असें नाहीं. मग काय निराश व्हावें ? नाहीं. साधकानें निराश कधींच होऊं नये. त्यानें आपली साधकाची सर्व युक्ति वापरून ती कमी पडेल तेथें भक्तीची जोड द्यावी, अशी फार मोलाची सूचना ह्या स्थितप्रज्ञांच्या लक्षणांत भगवंतांनीं देऊन ठेवली आहे. ही सूचना अगदीं मोजक्या शब्दांत दिली आहे. पण भाराभर व्याख्यानापेक्षां ती अधिक किंमतीची आहे. कारण भक्तीची जेथें नेमकी गरज, तेथेंच ती उपस्थित केली आहे. स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचें सविस्तर विवरण आज आपणांला येथें करावयाचें नाहीं. पण आपल्या सर्व साधनेंत भक्तीची ही नेमकी जागा आपण विसरूं नये म्हणून तिकडे लक्ष वेधून घेतलें. पूर्ण स्थितप्रज्ञ ह्या जगांत कोण होऊन गेला तें हरीलाच माहीत. पण सेवापरायण स्थितप्रज्ञाचें उदाहरण म्हणून पुंडलीकाची मूर्ति नेहमीं माझ्या डोळ्यांसमोरं येत असते. ती मी मांडलीच आहे.

---

## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ ( त्रैमासिक ) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ ( मासिक ) मार्चपर्यंतचें कांहीं अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास ( विशेष अंकांसह ) प्रत्येकीं ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठीं पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

MATUNGA CLANING WORKS
ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN
MODI NIWAS, BOMBAY 19
Washers, Dyers and Dry Cleaners.
A Pleasure to You—A Satisfaction to Us
Chemical Cleaners, Super Fine Darners
Master Dyers
*FOR*
Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths
सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार
माटुंगा क्लानिंग वर्क्स
स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक: एस्. व्ही. प्रधान

# संतांचें कोवळें हृदय

—श्री. निसर्ग दत्तमहाराज

साधूचें हृदय सदा कोवळेंच असतें. दुसऱ्याला पीडा होते हें कळल्यानें आपणाला जी कळकळ वाटते त्याला कोवळें हृदय म्हणतात, मातेच्या हृदयाला कोवळें हृदय अशी संज्ञा आहे. मातृहृदय हें उत्तम हृदय आहे, असा बोलबाला कां झाला असावा म्हणून विचार करावा तर उघडच डोळ्यानें पाहला मिळतें; जन्माला आलेलें मूल सर्वतोपरी अज्ञानी असतें नुसतें जीवंत आहे शिवाय त्याला कांहींच कळत नाहीं, कांहींशी उब असून एक ओला पदार्थ मात्र आहे, अशा वेळीं त्याच्या हालचालीवरून श्वासोच्छ्वासावरून त्याचें हृद्गत जाणून ( आपल्याच मतें ) ती त्याचें भरणपोषण संरक्षण उपचारादिक ज्या जाणीवेनें करतें त्या जाणीवेला मातेचें कोवळें हृदय असें म्हणतात. त्या बालकाची हालचाल आणि मातेच्या हृदयाची हालचाल जणूं काय एकच होऊन राहते. आपल्या गाढ झोंपेतूनसुद्धां एका निमिषांत जागें होऊन ती त्याला ( बालकाला ) चाचपूं लागतें, न्याहाळतें, सुरक्षितपणाची खात्री करून घेऊन पुन्हां झोपतें. जाग आणि झोंप दोन्हीं अवस्थेंत बालकाच्या जीविताशीं तिचें जीवित तन्मयता पावलेलें असतें, तरी पण साधु हृदयाशीं तुलना करून पाहातां हें हृदय अल्प मोलाचें ठरतें. कारण माझें बाळ ह्या पलीकडे तिला आणखी कांहीं अधिक बालकाची ओळख नाहीं. साधु हृदय तसे नव्हें, मूळापासून अंतापर्यंत त्याची [जीवाची] त्याला पूर्णपणें परिचयात्मक ओळख असतें.

## मातृहृदय व साधुहृदय

साधूचें हृदय सर्वात्मक असतें, मातेचें हृदय आपलें बाळ या जाणिवेनें कळकळीनें भरलेलें असतें तरीपण तिच्यां हृदयाची कळकळ आपल्या बालकांपुरतीं मर्यादित असतें, साधु हृदय सर्वात्मक असल्यामुळें प्राणीमात्राच्या सलंग जीवितांशीं ( अखिल जातीनेंच जोडलेलें म्हणजे एकजीव असलेलें ) ( पसरलेलें ) कोणाचें जीवित कुठून उगम पावलें आहे, कसें उगम पावलेलें आहे, पुढील दशा त्याला कोणती येणार आहे ह्याचें ज्ञान साधुला असतें. साधु शब्दानें परिपूर्ण, अविनाशी निर्मळ जीविताचा उल्लेख होतो. साधु शब्द उल्लेखाखालीं अतिस्थिर अचल जीविताचा प्रत्यक्ष भोगमयी भोग घडलेला असतो (जडलेला असतो) अशा त्या निर्मळ शांत अतिजुन्या (प्राचीन) आत्मस्थितीचा उल्लेख साधुशब्दांखालीं दैदिप्यमान असतो. त्या जीविताला परमात्मा अशी संज्ञा आहे. जगांत साधुवेश घेऊन ( साधुनाम घेऊन ) नाना वेष परिधान करून नाना प्रकारचे लोक वावरतांना दिसतात. विश्वजनही परोपरीनें त्यांना चाहातात. पुष्कळ ठिकाणीं साधु वेषांतील साधुच्या संगतीनें अनेक प्रमाद घडल्याचीं उदाहरणें आहेत.

सांप्रतही घडत आहेत, पुढेंही घडतील. वस्तुतः साधु उपमा ज्याला आली त्याला मुद्दाम असा कोणताच वेष घ्यावा लागत नाहीं कारण त्यांची अंतर्यामदशा आत्मज्ञानपूर्ण असून स्वस्थिती समाधान पावलेली असते. आपल्या ( स्वकीय ) ज्ञानानें स्वभाव पूर्णपणें स्वभावामध्यें मुरलेला असतो. त्याच्या ठिकाणीं अंतर्याम दारिद्र्य नसते. साधु आपली वस्तुस्थिती लपवून राहातो, लपवून वर्ततो, शरीरांवरील साधुनिदर्शक चिन्हांची त्याला मुळींच गरज उरत नाहीं, काल परिस्थिती, देशपरिस्थिती, शरीर अवस्था धर्म सहजा सहजीं ( नैसर्गिक ) परिस्थितीनें जो प्राप्त असेल असाच वेष तो धारण करतो. (भोगतो)

काया अंतर्गत याचा आत्मभाव लपलेला असतो, असाधु, स्वतःला साधु म्हणवून वेष चढवून आपलें मनोदय पुरें पाडण्याच्या खटपटीत सदाच असतात. साधु पुरुषाचा मनोभाव आत्मभावामध्यें समरस झालेला असल्यामुळें विश्वजनाकडे कोणत्याहि प्राप्ती-भावनेनें तो पाहात नाहीं. विश्व आदिकारण अणूंचे दर्शन त्याला घडल्यामुळें त्या अणूचा परिचय त्याला झालेला असतो. त्या अणूचे अंतर्याम सहज स्वभावधर्मानें विकसित होत असतें, त्यामुळें दिवसें दिवस उत्तरोत्तर नाना अवस्था पालट सदाच होत असतात. हा त्या अणूचा सहज स्वभावधर्म कळल्यामुळें साधु हर्षामर्ष प्रकारांमुळें उल्हसित किंवा विव्हल होत नाहीं. विश्वजनाच्या समजुतीचा यथार्थपणें थांग त्याला लागलेला असतो. विश्व-जनाच्या समजुतीचा–पासून–पर्यंतचा ( जन्मापासून मृत्युपर्यंत ) ( जनक जननी ) धर्म तो जाणतो. सकारण किंवा अकारण कां आणि कसा मनोधर्म जो निर्माण झाला आहे तो त्यानें पाहिला आहे, पहात आहे. त्यामुळें मिळणारा स्वार्थ अनर्थ त्याच्या मुळींच उपयोगी नाहीं, हें तो जाणतो. घटाकार प्रसंग ( शरिरप्रसंग ) आणि त्यामुळें पाहिजे अशी वाटणारी प्राप्तीची हांव व त्याचा उपयोग आणि कालमर्यादित उपयोगाला पुरूनही आणखी पुढील संचयाची हांव ( यापुढील जीवाचा कांहींच अनुभवाचा अनुमानाचा संसर्गही नाहीं ) उगाच जीवाला असतें. ही परिस्थिती साधु जाणत असतो म्हणून साधुपुरुष अति कळकळीनें आपलें हृद्गत ( सत्याचें ज्ञान ) विश्वजनाला सांगण्याचा प्रयत्न करितों. बालकाचें हिताहित जें मातेला कळतें त्याहूनही कोणाही जीवाचें सर्वात्मक ज्ञान साधुला कळतें म्हणूनच मातृहृदय अति दयाळु असतें.

## साधू भावनावश होतनाहीं

साधु विकारभावनावश होत नाहीं. जीवितविकार भावनायुक्तच असतें. सर्व भावनासंभवाचा जो आत्मा तोच साधूचा दृष्टीमूळ असतो. साधु आपल्या दृष्टीमूळाला उत्तम ओळखतो. साधूचा दृष्टिमूळ आत्मा तोच विश्वजनाचा चैतन्य आत्मा ( चैतन्य (आत्मा) त्याची हालचाल, त्यामुळें घडणारा प्रकार आणि आणि त्यामुळें होणारा परिणाम साधु जाणतो, म्हणून साधु विकारवश होत नाहीं. जीव चैतन्य आहे. भाव चेतन्यांतील वासनासमूह भावना मात्र भोग असून प्रत्यक्ष रुपात्मक असें त्याच्यांत कांहींच नाहीं, तरीपण जीवभाननेला त्याच्यामध्यें आपला महास्वार्थ आहे म्हणून आपलें सार्थक साधलें पाहिजे, या आशेनें मुळांत निरर्थक असूनही संचयभावना आणि भोगभावना

उराशी धरून जीव उगीच कुंथत राहातो. आयुष्य काळांत कांहीं विद्या, कला, कांहीं योग्यता, सन्मान आपणांला प्राप्त झाले आहे, असे कांहीं जाणूं लागला मग त्याला आपल्या अग्रपूजेच्या मानाची आवड, प्रतिष्ठा, अभिमान ( मी श्रेष्ठ आहे ) अशा भावनेचें हुंदक्यावर हुंदके येत राहातात, जसें आक्रोश करून रडणाऱ्याला समजावून कितीही समजूत घातली तरी त्यांचे रडकेपणाचे हुंदके त्याला आवरत नाहींत. तसेंच जगांतील कोणत्याही प्राप्तीच्या अधिक प्राप्तीमुळें ताटरलेल्या जीवाला आपल्या थोरवी आणि अभिमानाचे हुंदके आवरतां आवरत नाहींत. साधुपुरुष आपल्या मनानें थोरवी धरून बसलेल्या अशा जीवांकडे बघून भारी हळहळतात. अशा अभिमानानें भरलेल्या जीवाची साधूला भारी कींव येते. प्रतिष्ठा मानून बसलेला जीव आपल्या समजूतीनें जगांमध्यें आपण मोठमोठीं कार्यें करित आहोंत असें समजून प्रतिष्ठा भोगित असतो. पण तोच प्रकार साधु दृष्टीला कसा दिसतो ? एखाद्या अल्लड मुलानें ओसवून पडलेल्या केळींचा सोपा घेऊन जोरानें वर उचलून ठो दिशीं आपटावा त्याचाही आवाज मोठा येतो तरीपण तो आवाज जसा फुसका आहे, त्याचप्रमाणें जगांत कोणत्याही प्रकारची थोरवी कोणीही कितीही उराशीं धरून बसला तरी निव्वळ खोटी आहे म्हणून साधूला आत्मक्रियेच्या थोरवीबद्दल कसलीच प्रतिष्ठा शिवतसुद्धां नाहीं. साधुपुरुष भावना विरहीत असून तो सदा भावना आणि क्रिया यांच्याशीं अलिप्त राहातो.

जीवसमूह त्यांनीं मानलेल्या अशा खरोखरींच्या प्राप्तीच्या भावनेनें सदासर्वदा उगाच हळहळताहेत, त्यापासून परावृत्त करून जीवसमूहाला स्वमुखीं करण्याचा उपाय साधु कळकळीनें सांगत असतो. मातृहृदय आपल्या कळकळीनें दीर्घकाळ दुःखाचें मूळ वाढवितें, तिथेंच साधु कळकळीनें दुःखाचें मूळ दाखवितो साधु त्याचें पूर्णांग दाखवितो, मातृहृदय अपूर्णांगाची वाढ करतें. मातृपरिचयापासून दुःखाची सुरवात होते, तिथेंच साधू परिचयापासून सुखाची समृद्धी होते.

## साधूचें कोवळें हृदय

साधुपुरुषाला जिथें पूर्ण निरर्थकता दिसतें तिथेंच जीवाला महास्वार्थाची सार्थकता वाटतें. अज्ञानपणें आत्महितासाठीं जीव जे साहित्य गोळा करितो आणि ते साहित्य मिळविण्याकरितां मरणापर्यंतच्या प्रतिज्ञा स्वीकारून हातघाईवर येतो तिथेंच साधु दृष्टिला स्वच्छ अशी निर्फळता दिसत असते. जशी लहान मुलें कचऱ्यांतील जिनसांच्या पदार्थांचे तुकडे गोळा करून संचय करितात. त्यांच्या मनांतील हेतू मनमुराद खेळ करावा असा असून त्याला एकमेकांनीं अडथळा करितांच खरोखरीच्या मारामाऱ्या करून एकमेकाना जखमा करून दुःखी करितात, तिथें जाणत्या माणसांना त्यांचा स्वार्थ आणि भांडण निरर्थक दिसतें. तसेंच वेडी माणसें रस्त्यांतील चिंध्या, करवंट्या इत्यादि केरकचरा गोळा करून त्याचा गठ्ठा उरापोटाशीं धरून जपणूक

करितात. परंतु कोणी जाणत्या माणसांनीं त्याला हे टाकून दे म्हटल्याबरोबर चिडेला येऊन भांडण करितात. त्यांच्या ज्या क्रियाची (येड्याच्या) समंजस माणसांनीं जशी निरर्थकता दिसून येते तशीच ही निरर्थकता विश्वजनाच्या अहंभावनेनें जी जी कांहीं क्रिया घडते आहे आणि ती क्रिया साधुन दुसऱ्या जीवाच्या आड होऊन केवळ वखत साजरा करण्याकरितांही त्याचा इविर्भाव त्याला मिळूं न देतां युक्ती प्रयुक्तीनें आपल्या पदरीं पाडून आपली सत्ता त्याच्यावर स्थापित करून अनेकांच्या तात्पुरत्या गरजा भागविण्याच्याही आड येऊन अल्पप्रमाणांतहि त्यांना अन्नवस्त्रादिक लाभूं न देतां माती–दगडाच्या ढिगासारखा अनेक प्रकारच्या संपत्तीचा ढीग गोळा करून ठेवतात. तसेंच आपणांला विद्या, कला कांहीं थोरवी प्राप्त झाल्याचा बहाणा करून आपल्या सन्मानाकरितां आपली योग्यता अधिकामध्यें अधिक वाढविण्याकरितां परिस्थितीनें दुर्बळ असलेल्या जीवांना हैराण करून मरून जातात; इत्यादि जगांतील व्यवहार साधुच्या दृष्टी पुढून जात असतांना (घडत असतांना) साधु हृदयाला परिणामीक कळकळ झोंबते. निरर्थकपणें निरर्थक असूनही अगांतुक आणि असह्य अशा शरिरप्रसंगांत सजातीय असुनही (अंतर्याम संविद्ज्ञान) एकमेका साह्यकारी न होतां जो स्वार्थ साधवात त्या स्वार्थाला साधु हीन स्वार्थ म्हणतात. साधु हृदय कळकळीनें ओथंबलेले असते प्रारंभ पूर्वस्थिति, प्रारंभ कारण, कारण कारणभूत झाल्यानंतर शरिरयोगें भोगाव्या लागत असणाऱ्या नाना यातना आणि पुढें शरिरासहित त्या सर्वांचा होणारा अंत हा सर्व प्रकार साधू दृष्टीपुढें उघडपणें उघडा दिसत असतो; म्हणूनच साधु जीव तोडतोडून विश्वजनाला समजविण्याचा प्रयत्न करीत असतो. असें हें साधुचें कोवळें हृदय !

लहान मुलांच्या आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# मी व माझें अस्तित्व

लेखक : केशव कृष्ण प्रधान

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मला आठवतें कीं मी नुकतेच पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजांत पहील्या वर्षांत पदार्पण केले होते. त्यावेळी मला श्रीरामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांचीं पुस्तकें वाचण्याचा फारच नाद लागला होता. व त्या महान् पुरुषां-प्रमाणें आपणही एक वेळ तरी, दिव्य समाधी सुखाचा अनुभव घ्यावा अशी तीव्र इच्छा झाली होती. व म्हणून मी फर्ग्युसन कॉलेजच्या भोंवतालच्या टेकड्यामध्यें दूर एक शांत अशी जागा शोधून त्या ठिकाणी ॐ, ॐ, ह्या मंत्राचा जप करीत असे. एके दिवशीं मी असाच जप करीत असतांना एकाएकी मला माझ्या पाठीच्या कण्यामधून भस्स असा आवाज करून एक दिव्यशक्ति थेट पाठीच्या कण्यातून मस्तकापर्यंत एकाएकी चढून गेल्यासारखी वाटली. व माझे सर्व शरीर इतके जोरानें हालूं लागले की थोड्यांच वेळांत ते फुटून त्याचे तुकडे तुकडे भोवतालच्या हवेंत पसरतात की काय अशी मला एकाएकी जबरदस्त भिती वाटली. त्या भितीनें पूर्णपणें ग्रासल्यानें तो प्रकार तेथेच थांबवून मी तडक घराकडे परतलो व नंतर त्या भांबावलेल्या स्थितींत, मी माझ्या शैक्षणिक अभ्यासक्रमांतील पुस्तक वाचुं लागलो. तो काय चमत्कार! त्या पुस्तकांतील ओळी माझ्या नजरेपुढें वरखाली नाचुं लागल्या. व वाचन पुढें चालू ठेवणें मला दुरापास्त झाले. पुस्तक बंद करून मी माझे डोळे घट्ट मिटून घेतांच एक पाय बाह्यसृष्टींत तर एक पाय अंतसृष्टींत पडला आहे व बाहेरील जग व आंतील जग हे एकमेकांस वेगानें मिसळत आहेत असें वाटूं लागलें. या प्रकारानें तर मी आणखीनच घाबरून गेलो व हे असेंच पुढें चालू राहिल्यास मला खात्रीनें वेड लागेल असें वाटून मी माझ्यामधील सर्व आत्मशक्ती एकवटून तो प्रकार कायमचाच थांबवला.

### एका दिव्य शक्तीचा प्रताप

त्या गोष्टीला जवळ जवळ एक तपाहून जास्त काळ लोटला. महापुरुषाच्या सान्निध्यांत अमृताचा एकच गोळा होऊन जेव्हां मी घरीं परतलो तेव्हां एकाएकीं मला माझ्या निजावयाच्या खोलींत जाऊन, दरवाजे लावून एकांतात शांत ध्यानस्थ बसावें अशी इच्छा झाली. त्याप्रमाणें घाई घाईनें मी आंतमध्यें जाऊन एकांतात बसताच, एका तपापूर्वी अनुभवलेली तीच दिव्यशक्ती पुन्हा माझ्या पाठीच्या कण्यामधून, परंतु संथ आणि डौलदार—पाठीच्या प्रत्येक मणक्याला सुखावीत

इच्छेनें, वरवर चढूं लागली व थेट माझ्या मस्तकाच्या मध्यभागापर्यंत ( टाळूपर्यंत ) जाऊन पोंहचली. व त्या टाळूतून सर्व शरीरांतील नसानसाना सुखावणारा एक प्रकारचा अमृतस्राव होऊं लागला. पृथ्वीवरील महासागरांत मनुष्य बुडतो व तो मरून जातो. पण अमृताच्या महासागरांत बुडून माणूस जास्तच जीवंत होतो कीं काय असें मला वाटूं लागलें. त्या स्थितींतून जगाच्या अंतापर्यंत उठूच नये, एवढेच नव्हे तर त्या स्थितीला घट्ट मिठी मारून तिच्याशीच कायमचे एकरुप होऊन जावे, असें वाटून मी त्या स्थितीत किती वेळ होतो हे माझे मलाच समजले नाहीं.

अमृताची नदी जगांतील नद्यांसारखी उगमाकडून बाहेरील दुरच्या महासागराकडे वहात नाहीं. ती अगदीं उलट्या दिशेनें, अमृत महासागर असलेल्या महाभागांकडून मुमुक्षूंच्या हृदयांतील तिच्या उगमाकडे वेगानें वहात असते. फक्त अशा महाभागांचा एकदां तरी सहवास मिळण्याचें भाग्य त्या मुमूक्षूचे असले पाहिजे. एखादी प्रेयसी प्रेमांत पडल्यावर आपल्या प्रियकराचे अहर्निश चिंतन करते. त्याच्या आठवणीनें सुद्धां बसल्याच जागीं लज्जायमान होऊन, गोड गोड कल्पनांत दिवस–रात्र गुंगून राहते. त्याप्रमाणें त्या थोर महापुरुषाला भेटल्यापासून माझी स्थिति झाली. त्या महापुरुषाच्या सहवासांतला क्षण न् क्षण मला अत्यंत बहुमोलाचा वाटूं लागला. व त्याच्या कमल मुखांतून स्रवणारा अमृतस्राव मी केव्हां एकदां परत प्राशन करून तृप्त होईन; असें मला होऊन गेलें.

## परमात्मानुभाव घेण्याची क्षमता

दुसऱ्या दिवशीं मी त्या महापुरुषाच्या मंदीराकडे एखाद्या भारावलेल्या स्थितींतच गेलों. मला पहातांच नेहमीचेच ते मधुर हास्य करून वात्सल्यानें ओथंबलेल्या स्वरांतच त्यानें मला प्रश्न केला, ' तुझ्या चेहऱ्यावरून अजूनहि तुझे पाय पृथ्वीला लागलेले दिसत नाहींत. खरं ना ? अरे मन बुद्धीमागील आत्मस्वरूपाचे क्षणार्ध दर्शनसुद्धां प्राणीमात्रांना इतके वेडावून टाकते तर ज्यांनीं त्या आत्मस्वरूपाचा चेहरा मोहरा नीट न्याहाळलेला आहे अशा सत्पुरुषांना तोच आपला सतत स्थायीभाव व्हावा असें वाटत असल्यास नवल ते काय ? ह्या विश्वांत बाहेर असलेली हवा व मानवी शरीरांतील हवा एकच आहे. मानवी शरीरांत मात्र तिच्या गतीप्रमाणें तिला प्राण, अपान, व्यान, समान, उदान अशी निरनिराळी नांवें दीली आहेत. प्राणाचीगती उर्ध्व तर अपानाची गती अधोमुख असते. त्या दोघांची भेट श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणें मानवाच्या मस्तकातील ब्रह्मरंध्राजवळच होते. या प्राण, अपानांचा मीलनाचा अनुभव, मांनवाला त्याच्या मन, बुद्धीचे पूर्ण निराकरण केल्याशिवाय मिळत नाहीं. व हे निराकरण करण्यास त्याला मनबुद्धीमागील आत्म परमात्म स्वरूपाचा पूर्ण अनुभव घेतलेल्या पुरुषाकडेच धाव घ्यावी लागते. त्याला दुसरा मार्गच नाहीं. काल तूं माझ्या जवळ बसल्याबरोबर तुला हाच अनुभव देण्याचा

मी प्रयत्न केला. आणि तो थोड्या अंशी सफलही झाला आहे. असें मला वाटते. मानवाच्या पाठीचा उभा कणा व त्यावर चातुर्यानें अधिष्ठीत केलेला मानवी मेंदू ही परमेश्वराची एक अलौकीक कलाकृति आहे. गुदद्वार आणि ब्रह्मरंध्र ही मानवाच्या शरीरांतील दोन छिद्रें बंद करून फुफ्फुसांचा भाता चालवून मानवाच्या शरीरांत बाहेरील हवेचा प्रवाह त्याच्या नसानसातून कौशल्यानें खेळवणाऱ्या त्या जगन्नायकाचे करावे तितके कौतूक थोडेच आहे.

## मानव जीवनानंदाला का मुकतो ?


मानवी योनी ही सर्व प्राणीमात्रांत श्रेष्ठ योनी आहे. असें आपण म्हणतो त्याचे हेच कारण की इतर प्राण्यांसारखा मानवाचा पृष्ठ रज्जू जमिनीच्या समांतर रेषेत नाहीं. उभा पृष्ठ रज्जू हे उत्क्रांत वादाप्रमाणें सर्वांत श्रेष्ठ अशा संस्कृतीचें लक्षण आहे. जगांत जेथे जेथे मानव म्हणून आहे, मग तो आफ्रीकन असो, जर्मन असो, इंग्लीश असो; कोणत्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा असो; जगांच्या दृष्टीनें कितीही शिकलेला वा अशिक्षीत असो, भोळाभावडा असो वा पंडीत असो, ज्याला ज्याला म्हणून मानवी शरीर आहे त्याला केवळ ह्या पृष्ठ रज्जूच्या उभ्या रचनेंमुळें मन बुद्धी मागील परमात्म–स्वरूपाचा अनुभव घेण्याची क्षमता प्राप्त झाली आहे. वर, खाली, एकमेकाच्या विरुद्ध दिशेला वाहणारे हे प्राण अपान वायू एकदा का माणसाला पृष्ठ रज्जू मधुन, इडा, पिंगळा, ह्यांच्यामध्यें असलेल्या सुषुम्ना नाडीतून वर खेचता येऊ लागले की तो मानव परमात्म मंदीराच्या रस्त्याकडे लागला असें समजावे. आपण आपला श्वासोच्छ्वास जेंव्हा करतो तेंव्हा आपल्या दोन नाकपुड्यापर्यंन्त पोहचलेल्या इडा व पिंगळा ह्या नाड्यातून तो चालतो. आपण प्राण वायू आंत घेतो व अपान वायु बाहेर सोडतो. परंतु ह्या प्राण अपानांचे मिश्रण कांही वेळां आपल्या शरीरांत जास्त प्रमाणांत होते. उदाहरणार्थः—ज्यावेळीं आपण एखाद्या गोष्टीवर खोल विचार करीत असतो किंवा एखाद्या कामांत, वाचनांत निरीक्षणांत, श्रवणांत गढून गेलेले असतो तेव्हां ह्या प्राण अपानांचे मिश्रण शरीरांत जास्त होऊन ते इडा पिंगळा ह्यांच्यामध्यें असलेल्या सुषुम्ना नाडीच्या खालीं बंद असलेल्या रंध्रावर आगाध करीत असतात. या नाडीत नकळत थोडेसे घुसतात सुद्धा. अशा स्थितीत आपणास थोडावेळ का होईना, स्थळ काळाचे भान रहात नाहीं. हा मानवाचा नेहमीचाच अनुभव आहे ना! इडा व पिंगळा ह्या नाड्या श्वासोच्छवासामुळें सतत चालू असतात. परंतु त्यामधून गेलेली सुषुम्ना नाडी मात्र सायकलच्या ट्यूब मधून हवा काढल्यासारखी सर्व साधारण मानवात चिप्पट असते. एरव्ही नकळत ह्या मधून घुसू पहाणारे प्राण अपानाचे मिश्रण स्वेच्छेने ह्या सुषुम्ना नाडीतून एकदा का माणसाला करतां येऊ लागले कीं त्याच्या जीवनांतील आनंद वाढीस लागतो. परंतु पूर्णमन बुद्धीचे निराकारण केल्याशिवाय हा प्राण अपानाचा प्रवाह सुषुम्ना नाडीतून

नीटशी उर्ध्वगती घेत नाहीं व म्हणूनच मानव खऱ्याखुऱ्या जीवन आनंदाला मुकतो. हा प्रवाह शांत, डौलदार व एकसारखा मानवांत उर्ध्वस्थितीत लागावा म्हणूनच मुमूक्षूला गुरुकडे जाण्याची जरुरी असते. या प्रवाहाचा उगम सुषुम्नेच्या अगदीं खालच्या बंद छिद्रापासून उर्ध्वगतीस लागला कीं तो थेट मस्तकातील मध्यभागी असलेल्या ब्रम्ह रंध्रापर्यंत पोहचतो.

## त्या महापुरुषानें काय सांगितलें ?

लहानपणी जन्माला आल्याबरोबर पहिल्या कांहीं दिवसांत तुझी टाळू उडत असे. ते तुझ्या आईकडून तू ऐकले असशीलच. त्यावेळीं तुझ्या शरीरांतील ताज्या रक्ताचा स्त्राव ह्याच टाळूच्या नाजूक भागाकडे निसर्गतः जोरानें वहात होता. म्हणून तुझी टाळू उडत होती. परंतु तुझ्या आईनें त्यावर तेल घालून एरंडीच्या पानांचा उपयोग करून थोड्याच दिवसांत ती टाळू उडण्याची बंद केली. खरे म्हणावयाचे म्हणजे असें झालें कीं तुझ्या टाळूच्या भागाच्या ठिकाणीं पातळ मांसल पापुद्र्यानें बुजलेला रंध्रासारखा एक भाग होता. तो भाग दिवसेंदिवस तू जास्त वाढीला लागल्यावर बंद झाला. त्यावरील पातळ पापुद्रा हळू हळू जाड होत गेला. प्राण अपानांचा उर्ध्व प्रवाहानें ह्या पापुद्र्यातील रंध्र पुन्हा एकदा साफ उघडून मोकळे करणें हाच उद्देश, मानवाला उभा पृष्ठ रज्जू देण्यामध्यें परमेश्वराचा आहे. एकदां का मानवाला या ब्रह्मरंध्रातून ह्या प्राण अपनाचा प्रवाह बाहेरील हवेत स्वेच्छेनें फेकता येऊ लागला की त्यास आसमंतात भरलेल्या या अफाट हवेच्या विस्ताराशीं एकरूप होता येऊ लागते. मग तो श्री तुकाराम महाराजांसारखा 'तुका झाला आकाश एवढा' असें म्हणून आनंदानें नाचू लागतो. भोवतालच्या जगांतील जडाजडाशी एकरूप होण्याची क्रिया मग त्यास आपोआपच समजू लागते. व एखाद्या योग्याप्रमाणें तो 'सर्वं खलु इदं ब्रह्म' असें म्हणूं लागतो. 'वनचरे जाहली' जातिचे सोयरे, पक्षीही सुस्वरे आळविती' अशा अर्थाचा देहूजवळील पार्श्वनाथाच्या डोंगरावर बसून श्री तुकाराम महाराजांनीं गायलेला अभंग तुला माहीतच आहे. अरे भोळा भाबडा भक्त असो ! महात्मा गांधीसारख्या थोरवीचा कर्मयोगी असो, किंवा एखादा महान् पंडीत ज्ञानी पुरुष असो, प्राण अपानाचा हा प्रवाह; त्याच्या कोणत्याना कोणत्यातरी प्रयत्नानें पाठीच्या कण्यांतून थेट ब्रह्मरंध्रापर्यंत वाहू लागल्याशिवाय त्यास ती थोरवी प्राप्त होणेंच शक्य नाहीं. याचे कारण असें की मनबुद्धीच्या मागे जाऊन परमात्मदर्शन झाल्याशिवाय अखील मानवजातीची निरपेक्ष सेवा करता येणें शक्य नाहीं. हे माझे म्हणणें आजच्या स्थितीला तुला अतिशयोक्तीचे वाटेल. परंतु हळूहळू मी तुला हे तत्व नीट समजावून सांगेन. काल मी तुला मन बुद्धीमागें नेऊन तुझ्या अंतर्यामी दडलेले तुझे खोल खोल पण खरें असें स्वरूप, मेघाआड दडलेल्या चंद्रकोरीप्रमाणें थोडेसेच दाखविलें. परंतु त्यामुळें सुद्धां तुझी मन बुद्धी क्षणभर नाहींशी होऊन अमृतमय अशा आनंदाचा तुला अनुभव मिळाला. सर्व विषयांच्या मागे दडून आपल्या

पंचेन्द्रीयांना या आनंदाची निव्वळ भूल दाखविणारा पण प्रत्यक्ष त्यांना न मिळणारा हा अणूरेणूत भरलेला परमात्म प्रभू तुला थोडासा का होईना त्याच्या खऱ्या स्वरूपाचा पहील्या क्षणी दिसला त्यांतच तुझी थोरवी आहे. या आनंदाचा अनुभव जसा जसा तुला जास्त जास्त येऊ लागेल, तसा तसा तूं विषय सुखापासून होणाऱ्या आनंदाला कंटाळत जाशील. पंचपक्वान्नांचे भोजन मिळाल्यावर ज्याप्रमाणें माणूस सर्वसाधारण अन्नाकडे ढुंकूनही पहात नाहीं. त्याप्रमाणें या सुखापुढे तुला सर्व सुखे तुच्छ वाटू लागतील. व नीतितत्वे डांगोरा पिटवून देखील जे साध्य करू शकत नाहींत ते केवळ ह्या आत्मदर्शनानें साध्य होते अशी तुझी हळूहळू खात्री पटेल. कोणीहि मनुष्य एकारात्रीत सत्पुरुष होत नाहीं. आत्मदर्शन वारंवार झाल्याशिवाय मायेचें संपुर्ण निराकरण होणे अशक्य आहे. तोपर्यंत तू सर्वसाधारण माणसाप्रमाणेंच वागणार, विचार करणार व व्यवहारही करणार. पूर्ण आत्मदर्शनाशिवाय मात्र तुझी तृप्ती होणार नाहीं. माणसाच्या रक्ताला चटावलेल्या शार्दूलाप्रमाणें आत्मदर्शनाला चटावलेल्या माणसाची स्थिती आहे हे पक्के लक्षांत ठेव. इतके बोलून तो महापुरुष स्वात्मचिंतनात निमग्न झाला. व मींही अर्धवट, आत्मसुखासाठीं आसुसलेल्या स्थितीत घरी परत आलों.




॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें

लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)

* आमची कोठेंही शाखा नाहीं. *

# ‘ उभाच मी मागा ’

*********** ****** ********

लेे. द. शं. टिपणीस

**अगोदर प्रयत्न करावा मग ईश्वराला हांक मारा. प्रयत्न मानवाचा व सहाय्य देवाचें असें हें गणीत आहे. बाबा सांगतात कीं ‘ म्हणाल जोर म्यां काढावे। दुधाचे प्याले तुम्हीं रिचवावे। हें तो आपणा नाहीं ठावें। दक्ष असावें कार्याशीं ॥ आळसाचा त्याग करून नेहमीं आपल्या उद्योगांत मग्न रहा. उत्पादन वाढवा. स्वतः समृद्ध होऊन देशसमृद्ध करा, ईश्वर तुमचा पाठीराखा आहे. बाबांची ही जीवनदायी शिकवण प्रत्येकानें आचरणांत आणून ‘ नर करणी करे सो नरका नारायण हो जाय ’ हें प्रत्येकानें या जगांत सिद्ध करून दाखवावयाचें आहे. तरच या नरजन्माचें सार्थक.**

**—संपादक**

जीवन हा संग्राम आहे. झगडा आहे. Life is strife असें म्हटलें आहे तें योग्यच आहे. जिवंत असणें म्हणजे कांहीं तरी हालचाल असणें. क्रिया असणें होय. सूक्ष्मांत सूक्ष्म जंतू घेतला तरी तो वळवळ करील कांहीं हालचाल करील. जेथें क्रिया नाहीं, जेथें निष्क्रीयता आहे, जेथें स्तब्धता आहे तेथें जिवंतपणा नाहीं. जीवन जगायचें असतें. जगायचें म्हणजे क्रियाशील राहायला पाहिजे. जगणें ही आज एक कला झाली आहे. ती साध्य करून घेतली तरच आजच्या परिस्थितीत जिवंत राहतां येईल नाहीतर आत्महत्येखेरीज दुसरा तरणोपाय राहणार नाहीं. यासाठीं माणसानें सदैव कार्यप्रवीण असावें.

### आमचा सर्वांत मोठा शत्रू

पण काय मजा आहे पहा कीं जीवनाला मारणारा सर्वांत मोठा शत्रू, क्रियाशीलतेचा कट्टा विरोधी असा जो आळस त्याच्याकडेच माणूस अधिक ओढला जातो. आळसामुळें आयत्यासाठीं आम्हीं हापापलेले असतो. खरें सुख आयतें असूं शकत नाहीं. परिश्रमाची पार्श्वभूमि असलेलें सुखच माणसाच्या जीवनांत अमृत लावूं शकते उन्हांतुन तापून आल्यावरच थंड वाऱ्याची झुळूक व छायेचा शीतलपणा यांतील गोडी चाखावयास मिळतें. श्रम करून भुकेनें खवखवलेल्या पोटालाच अन्नाच्या अमृताची गोडी वाटते. असें असलें तरी आम्हीं त्याकडे दुर्लक्ष करतों. आम्हीं मुळांत आळशी आहोंत. आयतोबा आहोंत. श्रम न करतां आम्हांला पैसा पाहिजे. सुख पाहिजे.

राजकारण, समाजकारण, धर्मकारण कोठेंहीं घरीं दारीं पहा एकच वृत्ति. कमी श्रम जास्त मोबदला ही वृत्ति आम्हाला कष्ट नकोत प्रयत्न नको. ही वस्तुस्थिति इच्यात बदल झाला. आळसाची जागा उद्योगानें घेतली, अहोरात्र परिश्रम करण्यांची आवड निर्माण झाली तरच आपले राष्ट्र, आपला समाज, आपला धर्म व आपली प्रत्येक व्यक्ति अभ्युदयाच्या व वैभवाच्या शिखरावर जाऊं शकेल.

## उपनिषदांची गर्जना

असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी हा अध्यात्मामध्यें घुसलेला निष्क्रीय दैववाद वैदिक धर्माचा नाहीं. आपला वैदिक धर्म क्रियाशील आहे. कार्य प्रवण करणारा आहे. लाथ मारीन तेथें पाणी काढीन हा त्याचा बाणा आहे. करीन तीं पूर्ण ही त्याची प्रतिज्ञा आहे. आपल्या उपनिषदांची ही गर्जना आहे, ताकद कमवा व प्रयत्न करा असें त्यांचे सांगणें आहे. नुसतें सांगणेंच नव्हें तर त्यासाठीं कोणती साधना करावी हेंही ते सांगतात. आम्हीं वैदिक धर्माचे असून आम्हाला त्याचे ज्ञान नाहीं व साधुसंता खेरीज इतर महाभागांनीं कधीं तें जनतेला करून दिलें नाहीं. साधुसंत देव-भोळे असा शिक्का मारून आम्हीं त्याकडे दुर्लक्ष करीत आलों. व परिणामी आम्हीं आमचें तेज व सामर्थ्य गमावून बसलों. लोक जागृतीसाठीं बाबांनीं पुन्हां उपनिषदांची गर्जना केली आहे.

## हरी कोणाचा ?

खाटल्यावर बसुन राहणाऱ्यांचा हरी नाहीं. तो प्रयत्नवादी लोकांचा आहे. प्रयत्नवाद क्रीयाशील आहे. त्यांत पराक्रम आहे. पुरुषार्थ आहे. देवाला तोच प्रिय आहे. अशांनाच देव सहाय्य करतो. माणूस हा दिसतो तितका साधा वा किडमुंगीसारखा क्षुद्र नाहीं. माणसाच्या ठायीं ईश्वरानें अनेक शक्ति निर्माण केल्या आहेत. बीज केंद्रांत बीज उत्पादनाचें केंद्र असते; परंतु मानवाच्या ठायीं नाना शक्तीची केंद्रे असतात. तीं किती याची गणती अजून तरी कोणाला झाली नाहीं. माणूस म्हणजे नाना शक्तीचे एक मोठें शक्तिकेंद्र ( Powsr house ) आहे. मात्र या सर्व शक्ति सुप्त अवस्थेंत असतात. आपल्या ठायीं असलेली शक्तिकेंद्रे माणसानें चालू करून सामर्थ्य कमवावें. त्याच्या जोरावर त्यानें चराचर सृष्टीवर ताबा मिळवावा, अशी ईश्वरेच्छा आहे. चंद्रावर धडक मारण्याचा प्रयत्न पाहून ईश्वराला कौतुकच वाटेल. मानवानें अणुशक्ति हस्तगत केल्याबद्दल त्याला आनंदच होत असेल. आपली लेकरें आपल्याबरोबर धावूं इच्छितात हें पाहून त्याला कौतुकच वाटतें. घुस्सा नाहीं येत. कारण मानवानें बुद्धि चालवावी व या सृष्टींतून स्वतःच्या सुखासाठीं व उपभोगासाठीं जेवढें कांहीं घेतां येईल तेवढें त्यानें खुशाल घ्यावें अशी त्याची ईच्छा आहे. त्यासाठींच त्यानें मानव निर्माण केला आहे. आपल्या कर्तृत्वाशीं त्यान चढाओढ करावी, सर्व शक्ति त्यानें हस्तगत कराव्यांत व शेवटीं तो व आपण

एक व्हावें, समरस व्हावें, एकरुप व्हावें हाच त्याचा उद्देश ही चराचर सृष्टी घडविण्यांत आहे. देवाचा खजिना खुला आहे. प्रत्येकानें आपआपल्या ताकदी-प्रमाणें पाहिजेत तीं रत्न माणकें घेऊन जावें. प्रयत्न करावा, खणावें, खोदावें, बुद्धि चालवावी आणि ऐहिक वा पारमार्थिक पाहिजे तो खजिना खुशाल लुटून न्यावा. येथें जातिधर्मांचें, वयाचें, स्त्रीपुरुष भेदाचें कोठलेंच बंधन नाहीं. ही गोष्ट

**उतून चालिला आहे खजिना । एकही कोणी गाड्या आणीना ।**
**खणा म्हणतां कोणीही खणीना । प्रयत्न कोणा करवेना ॥** अ. ३२-१६२

बाबा या ओवींत सांगत आहेत.

## मानवाला देवपण यावें

याला अट एकच. या खजिन्याचा उपयोग माणसांतील माणुसकी वाढीस लागून त्याला देवपणा येईल असा करावा. मानवाचा दानव अगर पशु होतां नये. तसें होऊं लागलें तर मग देवी तडाखे बसल्या खेरीज राहणार नाहींत. या सृष्टींत मानव श्रेष्ठ आहे कारण मानवाचा देव होऊं शकतो. ज्ञान व तितिक्षा या सर्व श्रेष्ठ शक्ति मानवास दिल्या आहेत. त्यांचा उपयोग मानवानें आपली संकटें वा अडीअडचणी यांतून पार पडण्यासाठीं करावा अशी ईश्वराची ईच्छा आहे. या दोन शक्तींचा उपयोग करूनही यश प्राप्ती झाली नाहीं तर मग ईश्वर साहाय्यं आल्याचून रहाणार नाहीं. **नुसते देवा धावरें धाव असें ओरडण्यानें कांहीं एक होणार नाहीं.** प्रयत्न आपला व यश देवाचें. खटपट केली पाहिजे, प्रयत्न केला पाहिजे. हालअपेष्टा सहन करून शत्रूशी झगडत राहिजे पाहिजे. मानवी बुद्धिचा करवेल तेवढा उपयोग केला पाहिजे. मग ईश्वरी कृपेची अपेक्षा करावी. अशांना ईश्वर प्रसन्न होऊन पुरेपुर मदत करील. पुढील ओवींत बाबांनीं भक्तांना हाच उपदेश केला आहे.

## बाबांचा सदुपदेश

**तुम्ही जोर काढूं लागा । दुधाची काळजी सर्वस्वी त्यागा ।**
**वाटी घेऊनी उभाच मी मागा । पृष्ठ भागा आहे कीं ॥** अ. १८-१५८

तुम्हाला दूध पाहिजे ना ? ठीक आहे. ह्या गाई म्हशी। त्यांना पाळा. त्यांची निगा राखा. त्यांना खाणें, पिणें द्या व दुधाची धार काढा व सुखानें दूध प्या. एवढें केलेंत कीं दुधाची निर्मिती हे माय तें मी करीन. तुम्हीं न सांगतां करीन. धार काढूं लागा. प्रयत्न करा. मी तुमच्या मागें साह्यार्थ आहेच. परंतु—

**म्हणाल जोर म्यां काढावे । दुधाचें प्याले तुम्हीं रिचवावे ।**
**हें तो आपणा नाहीं ठावें । दक्ष असावें कार्यार्थी ॥** अ. १९-१५९

असें कांही असेल तर तें उपयोगी नाहीं. जोर म्यां काढावे-प्रयत्न श्रम मी करावे व तुम्ही मात्र फुकाचे दुधाचे प्याले फस्त करावें हें आम्हास मान्य नाही. अशा

ठिकाणीं आम्ही असणार नाहीं. हें बाबांचें सांगणें आहे. सगळें कांहीं देवानें करावें व आपण फळ तेवढें उपटावें, हा मानवी कावा देवाला मान्य नाहीं, एवढेंच नव्हे तर त्याला देवाचा विरोध आहे. आयत्यावर कोयता हें त्याज्य आहे. आयत्या बिळांतील नागोबा होऊं नये. असलें विचार टाकून द्या. आपल्या कार्यासाठीं प्रयत्न करा. देवानें दिलेलें तें उपयोगांत आणा. म्हणजे मग देव तुमचा पाठिराखा आहे. मुलाला खर्च करण्यास दिलेले पैसे संपल्या खेरीज वडील अधिक पैसा देणार नाहींत. ईश्वरानें दिलेल्या सर्व शक्ति कुंठीत झाल्या खेरीज इश्वर आपली शक्ति वापरून तुम्हाला सहाय्य करणार नाही. पहिला हिशेब चुकता करा व मग नवीन पैसा मागा. प्रयत्न करा व मग ईश्वराला हांक मारा. प्रयत्न मानवाचा व साहाय्य देवाचें, असा हा करार आहे. माणूस अर्धा ईश्वर आहे. प्रयत्न, श्रम, कष्ट करावेत व त्यानें पुर्णत्वास जावें.

---

## लेखकांस विनंती

'श्री साईलीला' मासिकाचें ध्येय व धोरण सर्वांना माहित झालेलें आहे. श्रीसाईबाबांची शिकवण, साधुसंतांची शिकवण, साधुसंतांची चरित्रें, आठवणी त्याच-प्रमाणें साधकाचें व मुमुक्षूजनांचें अध्यात्म मार्गांत मार्गदर्शन होईल अशा प्रकारचे विचारप्रवर्तक व मार्गदर्शक लेख व कविता श्री साईलीलेंतून प्रसिद्ध व्हावें व अशारीतीनें श्रीसाईबाबांची सेवा घडावी, यासाठीं आमचे प्रयत्न चालू आहेत. या कार्यांत आमच्या लेखक–वाचकांनीं यथाशक्ति सहभागीं व्हावें अशी विनंती आहे.

लेख मार्जिन सोडून कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरांत लिहिलेला असावा.

श्रीसाईलीलेच्या ध्येयधोरणांशीं अनुकूल अशाच लेखांना योग्य वेळीं प्रसिद्धी दिली जाईल.

—संपादक–श्रीसाईलीला

---


# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स

# श्रीनिसर्गदत्त महाराज : अल्प परिचय

लेखक : महाराजांचा एक शिष्य

श्रीनिसर्गदत्तमहाराज यांचे नांव आमच्या वाचकांच्या वाचण्यांत अनेक वेळां आलें असेल. त्यांनीं आपल्या शिष्यांना व भक्तजनांना उद्देशून केलेलीं कांहीं प्रवचनें मधून मधून साईलीलेंतून प्रसिद्ध होत असतात. शक्य तर वाचकांचें अध्यात्म मार्गांत मार्गदर्शन व्हावें हाच त्यांत हेतू असतो. त्यांच्या सहवासांतील त्यांच्या एका शिष्यानें हा परिचय करून दिला आहे. श्रीनिसर्गदत्तमहाराजांचा हा अल्प परिचय त्यांच्या सदुसष्ठाव्या वाढदिवसनिमित्त पुढें देण्यांत येत आहे. हा वाढदिवस गेल्या एप्रीलमध्यें साजरा झाला. ज्यांना स्वरूप साक्षात्कार झाला ते धन्य होत. त्यासाठीं तर जन्माचा सारा आटापिटा. सुदैवानें ज्यांना तो झाला त्यांची गणना संतांमध्यें केली जाते. असें अनेक संत या देशांत होऊन गेले व आजही आहेत. स्वरूप साक्षात्कार होऊनही त्यांचे सर्व व्यवहार चालू असतात. परंतु कसें ? 'आतां उरलों उपकारापुरता' या न्यायानें. आपल्या सभोंवारच्या लोकांनीं सुबुद्ध व्हावें, माणूस खऱ्याखुऱ्या अर्थानें व्हावें, जगांत माणुसकीनें वागावें असें त्यांना वाटत असतें व त्यासाठीं त्यांचे प्रयत्न अहर्निश चालू असतात.



श्री निसर्गदत्तमहाराज हे अशा थोर पुरुषांपैकीं एक आहेत.

## बालपण व शिक्षण

त्यांचे संपूर्ण नांव श्री. मारुतिराव शिवराम कांबळी हें असून त्यांचा जन्म या मुंबापुरीतील एका लहानशा चाळींत हनुमान जयंतिदिनीं-पहाटेच्या सुमारास १७ एप्रिल १८९७ रोजीं झाला. त्यांचे पूर्वप्राथमिक शालेय शिक्षण मालवण तालुक्यांतील कांदळगांव येथें झालें. इंग्रजी शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा व आवड असूनहि घरच्या गरीब परिस्थितीमुळें त्यांना ती फलद्रुप करतां आली नाहीं, तथापि मुंबईंत आल्यावर थोड्याफार प्रयत्नांनीं इंग्रजी २ री पर्यंतचें शिक्षण घेऊन पुढील शिक्षणाला सांपत्तिक अडचणीमुळें रामराम ठोकला.

लहानपणापासूनच त्यांना परमार्थाचा हव्यास होता. ग्रंथवाचन, देवदेवादिकांच्या मूर्ति पुजणें, देवदर्शनाची आवड, व्यासंग त्यांना होता. उपोषणें, व्रतवैकल्यें ते नित्यनियमानें करींत असत. भक्तीची आवड त्यांना बाल्यपणापासूनच होती. त्यांची मुंबईत कापडाची ५-६ दुकानें ( स्टोअर्स ) होतीं परंतु त्यापैकीं आतां एकही शिल्लक नाहीं.

प्रथम त्यांनीं कांहीं दिवस टॅलिक्लार्कची नोकरी केली. शेती हा तर त्यांचा घरचाच व्यवसाय. गांवीं असतांना कित्येक वेळां त्यांनीं जुन्या वृत्तीच्या माणसांचा रोष व विरोध पत्करूनहि अनेकांना संकटप्रसंगीं नाना तऱ्हेनें मदत केली. गरीबांची सेवा—हा तर त्यांच्या अंगचा उपजतच धर्म होता—आहे.

**कायापालट झाला**

मुंबईस आल्यानंतर त्यांच्या एका स्नेह्यानें—त्यावेळेस—सन १९३३ च्या सुमारास श्रीसिद्धरामेश्वर महाराजांकडून अनुग्रह देवविला. प्रथम ते अनुग्रह घेण्यास राजी नव्हते. कारण ' मानवी आकृतीच्या चरणांवर मी डोकें ठेवणार नाहीं ' अशी त्यांची प्रतिज्ञाच होती; परंतु स्नेह्याच्या अति आग्रहास्तव व विनंतीस मान देऊन उपदेश घेतल्याबरोबर त्यांच्या अंतर्यामीं इतका बदल झाला—कायापालट झाला—कीं त्यांनीं आपल्या स्नेह्यास—गुरुबंधुस—स्वच्छ सांगितलें कीं, ' माझा आतां संसार सुटला ' संसारावरचें त्यांचें मन उडालें. याचवेळीं त्यांनीं असाहि अनुभव घेतला कीं वडिलोपार्जित जपून ठेवलेले धार्मिक ग्रंथ, ज्यांचा अर्थहि त्यांना कधींच कळत नव्हता, अशा ग्रंथावर ते एक वर्षाच्या आंतच प्रवचन देऊं लागले. येथें एक विशेष उल्लेख करावासा वाटतो कीं, त्यांना परमात्म ज्ञान प्राप्त होण्यास वर्षाचाहि अवधि लागला नाहीं. यावरून त्यांची गुरुश्रद्धा किती जोमदार होती यांची वाचकांनींच कल्पना केलेली बरी. श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या निर्वाणानंतर आमचे महाराज एके दिवशीं अकस्मात आपलीं भरभराटीस आलेलीं कापडाची दुकानें सोडून ऐन दिवाळीच्या मोसमांत आपल्या वयोवृद्ध मातेस दोन लहान अपत्यें व कुटुंबास न कळवितांच अंगावरच्या कपड्यांसह बाहेर पडले. प्रथम ते पंढरपूरास गेले व तेथें गृहस्थाश्रमीचीं भूषणें उतरवून भगवीं वस्त्रें परिधान केली व खिशांत राहिलेला एक आणाही शेवटीं त्यांनी चंद्रभागेस समर्पण केला. अशा रीतीनें जनदृष्ट्या ते निष्कांचन अवस्थेत पुढचा मार्ग आक्रमूं लागले. जवळ जवळ ८ महिने ते अशा अवस्थेत परिभ्रमण करीत होते. अंगावरच्या एका फाटक्या कांबळीशिवाय त्यांच्याजवळ दुसरें कांहींही नव्हतें. एखाद्या ठिकाणीं साधु म्हणून आदरसत्कारानें पूजा व्हावयाची तर काही ठिकाणीं त्याच्या उलट अनुभव यावयाचा. त्यांनी अनुभविलेले कांहीं चमत्कार वाचकास मुग्धच करतील.

**प्रवासांतील हालअपेष्टा**

प्रवासांत जें मिळेल त्या अन्नावर त्यांना आपला जठराग्नि शमवावा लागे; केव्हां केव्हां विशेषतः त्यावेळच्या मद्रास इलाख्यांत फिरत असतांना तर भाषेच्या अडचणीमुळें

गुणेवरच भागवावें लागे; परंतु तेथील जनतेच्या साधुसंतांवरील भक्ति श्रद्धेमुळें त्यांना उपास सहसा पडला नाहीं. उलट आदरानें पूजा होऊन भोजन मिळे; परंतु केव्हां केव्हां मार्ग आक्रमित असतां त्यांना खडतर प्रसंग अनुभवावे लागले तरी पण ' सद्गुरु सारिखा असतां पाठीराखा ' या वचनाचा तंतोतंत अनुभव त्यांनीं घेतला. भ्रमंति करीत असतांना पायांत चप्पल नसल्यानें चटके सहन करीत व त्यामुळें त्यांना फार त्रास होई; केव्हां केव्हां त्यांना आमांशाचा हो विकार जडे, मधुन मधून मूळव्याधीसारखा प्रकार हैराण करीत असें, शौचास जातांना रक्तही पडे, परंतु त्यास ना औषध ना उपचार; औषध एकच गुरुनामस्मरण, परंतु तें विश्वासाचे असें. कांहीं कांहीं वेळां त्यांना आपल्या पायाच्या तळव्यावर महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घडे तेव्हां तर त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहात.

नेताजी सुभाषचंद्र नाहींसे झालें होते त्यावेळेस त्यांना पकडण्यासाठीं त्यावेळच्या ब्रिटीश सरकारनें जंग जंग पछाडलें. साधू व भटक्या लोकांवर पण संक्रांत आली. त्याचप्रमाणें आमचे महाराज हे हैद्राबद संस्थानांत साधुवेषांत फिरत असतांना संशयावरून पकडले गेले होते व त्यांना न्यायाधीशासमोर उभे केलें. त्या मुसलमान न्यायाधीशालाही महाराजांचे त्यावेळचे तेज पाहून व निर्भयपणें सडेतोडपणें दिलेले उत्तर पाहून एवढें आश्चर्य वाटलें कीं, त्यानें एका कंत्राटदारास महाराजांसाठीं जामीन राहाण्यास सांगितलें; परंतु तो तयार होईना तेव्हां त्याचा परवाना रद्द करून स्वजातीच्या एका श्रीमंत व्यापाऱ्यास जामीन राहावयास भाग पाडलें व महाराजांची अशा रीतीनें मुक्तता केली.

सहा महिने अशी भटक भ्रमंति करीत असतांना सामान्य बुद्धीला न पटणारे नाना चमत्कार त्यांनीं अनुभविले, त्यांची जंत्री येथें देतां येत नाहीं. ( किंबहुना महाराजांनाच तें आवडणार नाहीं म्हणून मोह टाळतो )

## मुंबईत पुनरागमम

अशा प्रकारें स्वरूपप्राती पूर्णपणें अंगीं बिंबविल्यानंतर नाना हाल अपेष्टा क्लेश सहन करून एके दिवशीं अकस्मात ते मुंबईस परतले. तेव्हां त्यांची सर्व दुकानें गेलेलीं होती. फक्त एकच–सध्यां असलेलें–तंबाखूचें दुकान शिल्लक राहिलें होतें व तेंही दुसराच इसम चालवित होता; परंतु महाराज आल्याचें कळतांच त्यानें निमूटपनें–बिनतक्रार तें महाराजांच्या स्वाधीन केलें. तें आजतागायत चालू आहे.

मुंबईस परतल्यानंतरहि महाराजांची दैनंदिन क्रिया पूर्वीप्रमाणें चालू होती. भजन–पूजन ध्यान धारणा चालूच असे परंतु स्वरूपप्राप्तीचा निश्चय होण्यापूर्वीची साधना व परिपूर्णतेचा साक्षात्कार झाल्यानंतरची साधना यांत महदंतर होतें. पूर्वी ध्येयप्राप्तीसाठीं साधना व आतां वास्तविक साधनेची गरज नसतांनाहि चालू असलेली साधना यांत फार फरक. आतां शिवं भूत्वा शिवं यजेत्–देव होऊन देवाची पूजा करणे यांत जो परमानंद आहे तो वाचेनें सांगून कसा कळणार ?

साधन काळी साधक अवस्थेंत गुरु वाक्य प्रचीति म्हणून त्यांनीं कांहीं वेळां रोग पीडितांना, अडचणींत सांपडलेल्यांना, आपत्तींत सांपडलेल्यांना आपल्या गुरूची विभूति किंवा कित्येकवेळां नुसतें पाणी तीर्थ म्हणून देऊन त्यांची दुःखांतून सोडवणूक झाल्याची प्रचीति घेतली. कांहीं कांहीं वेळेस असाध्य रोगांवर मुद्दाम तें साधें औषध करण्यास सांगून रोगी पूर्णपणें बरा झाल्याची खात्री करून घेतली. या गोष्टी त्यांनी चमत्कारासाठीं म्हणून न करतां केवळ गुरु वाक्य प्रचीतीचा अनुभव घेण्यासाठीं केल्या. स्वतःच्या अंगीं बाणलेल्या ज्ञानसामर्थ्यांची थोडीशी चांचणी त्यांनीं या अनुभवानें घेतली. महाराज प्रसिद्धिविन्मुख असल्यानें ज्या कांहीं थोड्या लोकांना आपल्या ज्ञानसामर्थ्यांचा लाभ दिला त्यांना त्यांचेकडून वाच्यता न होण्याची हमी घेतली त्यामुळें महान् संत असूनही अद्यापपर्यंत जन-समुदायाला त्यांचा तितकासा परिचय नाहीं.

## धन्य ते गुरूजी

महाराजांकडे जी शिष्यमंडळी जमत असतात त्यामध्यें कांहीं सुशिक्षित तर कांहीं अशिक्षितही आहेत. १९५१ च्या नंतर त्यांनीं नामोपदेश देण्यास सुरवात केली; त्यापूर्वीही जरी प्रत्यक्ष उपदेश मिळाला नसतांनाहि त्यांनाच गुरू मानून वावरणारी शिष्यमंडळी होती. त्यांपैकीं नंतर तसेंच टिकाव धरून असलेल्यांना उपदेश मिळाला; कांहीं कांहीं मंडळींना तर १२ वर्षांनें त्यांनीं अनुग्रह दिला. धन्य ते सद्गुरु व धन्य ते शिष्य.

महाराजांकडे कोणत्याही धर्मांचा वा जातीचा कोणीहि आल्यास त्यास प्रत्यवाय नाहीं. स्वरूपज्ञानी साक्षात्कारी संतपुरुषांची धर्माबद्दलची व्याख्या सामान्य जनांस पटणार नाहीं. सामान्य जनता वेदशास्त्रें प्रतिपादीत कर्मकांडाला अनुसरून क्रिया करीत असतात व त्याचमुळें चातुर्वर्ण्याला सामान्य जनता विशेष प्राधान्य देत असते. कारण देहबुद्धी सत्य मानून तें व्यवहारतात; परंतु स्वरूप साक्षात्कारी सत्पुरुषांच्या अंतर्यामी जातिभेद अंशमात्रही शिल्लक नसतो. त्याकरितां त्यांचा छळ झाला तरी त्याची त्यांना पर्वा नसते. उपजतांना कोणीही जातीचा वा धर्मांचा शिक्का घेऊन उपजत नाहीं. जात व धर्म हे केवळ ऐकविल्यामुळें आहेत. मग जातिभेदाला संतांकडे थारा कसा असणार! परंतु अल्पमतिला हें पटणार नाहीं. व्यापकाला व्यापकच दिसतें. संतांची दृष्टि व्यष्टिरूप नसून समष्टीरूप असते व म्हणूनच ते जाति धर्मांचा उच्छेद करतात. ह्या जातिभेदाच्या पडद्यामुळेंच आमच्या भारतवर्षाचें अतोनात नुकसान झालें. जोंपर्यंत ह्या जातिभेदाचा–उच्च नीतेचा समूळ उच्छेद होत नाहीं तोंपर्यंत मान-वाचें–भारतांतील मानवसमूह केव्हांही आगेकूच करणार नाही. संतांनी आपापल्या परीनें जातिभेद गाडून टाकण्याचा प्रयत्न कसोशीनें केला व करीत आहेत परंतु बहुजन समाज तेवढी उत्सुकता दर्शवित नाहीं; यांत नुकसान हिंदुधर्माचें आहे. हिंदुधर्म व्यापक असतांनाहीं सनातन्यांनीं भरवून दिलेल्या कल्पनेमुळें आज त्याचा ऱ्हास होत आहे.

वास्तविक सर्व धर्मांचें तत्त्व एकच असतांना हिंदुधर्मच श्रेष्ठ कां ? तर हिंदुधर्म जेवढा व्यापक आहे तेवढे इतर धर्म नाहींत. याचा अर्थ असा नव्हे कीं हिंदुधर्म इतर धर्मांचा तिरस्कार करतो. खऱ्या पारमार्थिकाला कोणत्याही धर्माबद्दल आदरच असतो. आम्ही अभिमानानें म्हणूं इच्छितों कीं, आमचे महाराज आम्हांस हीच शिकवण सदोदित देत असतात.

साधुसंतांना सर्वच धर्म सारखे. त्यांचा धर्म एकच व तो म्हणजे स्वरूप हा होय. श्रीसमर्थ रामदासांनीसुद्धां एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं "धर्मामाजीं मुख्य धर्म स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म" –खुद्द महाराजांच्या निवासस्थानीं–त्यास 'निसर्गदत्त आश्रम' हें नामाभिधान आपोआपच प्राप्त झालें आहे. राम, कृष्ण, इतर साधुसंत तसेंच झोरोष्ट्रीयन बुद्ध वगैरें अन्य धर्मीयांच्या छबींचीही पूजा केली जाते. ते आपल्या शिष्यांमध्यें सुशिक्षित वा अशिक्षित, बुद्धीमान वा अबुद्धिमान, जुना वा नवा, लहान वा थोर, स्त्री वा पुरुष असा भेद करीत नाहींत. ते समदृष्टीनेंच सर्वत्रांकडे पाहातात. ते जेवढें दयाळू आहेत तेवढेंच शिस्तप्रिय आहेत; आश्रमांत आल्यावर कोणीही इतर अवास्तव विषय बोलूं नयेत यावर त्यांचा कटाक्ष असतो; कारण त्यामुळें मूळ विषयाला–परमार्थ विषयाला–कलाटणी मिळते. त्यांच्याकडे कोणीही येऊन आपल्या अडी–अडचणी निवेदिल्या तर ते त्या अडचणी निवारण्याचा उपाय सांगतात. कित्येकांनीं अनुभव घेतलेले आहेत. अर्थात गुरुश्रद्धा व भक्ति श्रद्धावानाला तात्काळ परिणाम चिकित्सक वा टवाळखोरीनें आलेल्यांना आपाआपच नैसर्गिकरीत्या उत्तर मिळतें. म्हणून महाराज नेहमीं म्हणतात कीं "साधुसंतांच्या वाटेला जाऊं नका" तुम्हांस त्यांचे वागणें, बोलणें पटत नसेल तर निदान गप्प बसा. निंदा वा मत्सर करूं नका. त्यामुळें निंदा करणाऱ्याला आपोआपच संकल्पिल्याशिवाय अदृष्टांतून उत्तर मिळतें.' श्रद्धावानाला मात्र पुरेपूर फायदा मिळतो. बुद्धीवादी आपल्या बुद्धीच्या निकषावर साधुसंतांचें म्हणणें ताडून पाहातील तर त्यांना तें केव्हांहि पटणार नाहीं. नव्हे, समाधान मिळणारच नाहीं.

महाराजांकडे येणाऱ्यांना कांहींहि खर्च नसतो. उलट ते सांगतात कीं, 'तुम्हीं मला कांहीं देऊं नका, तुम्हांस काय जें पाहिजे तें मागा, तें तुमच्या श्रद्धेनेंच सद्गुरुवचनावर विश्वासिल्यावर मिळेल. मला फक्त एकच द्या व ते तुमचे दुर्गुण. ते मात्र तुम्हीं परत घेतां कामा नये.' त्यांचे दुसरें वैशिष्ट्य कीं, ते कोणाहि शिष्याकडून कसल्याहि प्रकारची सेवा करून घेत नाहींत, उलट त्यांना असल्या प्रकारची अत्यंत चीडच येते.

# अमृतानुभव लेखनाची कथा

'अमृतानुभव' ग्रंथ लिहून तयार झाला. त्यांतील तज्ज्ञ मंडळींनीं ही टीका मान्य केली तरच ती लिहिण्याचें सार्थक. अमृतानुभवांतील जाणकार मंडळी वांचुन इतरांच्या उत्तम अभिप्रायाला विशेष मोल अर्थातच नसणार. तज्ज्ञांतहि 'बोद्धारोमत्सरग्रस्तः' असेंच फार. काय करावें हा मोठा प्रश्न उपस्थित झाला.

पुणें येथील ज्ञानेश्वरीचे प्रवचनकार, निष्ठावंत वारकरी व संत श्री. केशवराव महाराज देशमुख यांच्याविषयीं श्रीदासगणूंना विशेष आदर प्रेम वाटत असे. त्यांनीं आपला हा ग्रंथ पहावा, असें श्रीदासगणू महाराजांना वाटलें. श्री. केशवराव हे थोर अधिकारी आहेत. त्यांनीं जर अनुकूल अभिप्राय दिला तरच टीका चांगली झाली असें मानतां येईल. तो निस्पृह पुरुष तोंडदेखलें बोलणार नाहीं, ही निश्चिति होती.

श्री. केशवराव महाराजांच्या प्रवचनास नियमानें उपस्थित असणारे व श्रीमहाराजांच्या भेटीस प्रेमानें वरचेवर येणारे श्री. नानासाहेब आठवले यांना महाराज म्हणाले'

'नानासाहेब, मी अमृतानुभवावर ओवीबद्ध टीका लिहिली आहे. ती श्री. केशवराव महाराजांनीं पहावी, अशी माझी इच्छा आहे. मी फक्त त्यांचें नांव ऐकून आहे. कांहीं प्रवचनें ऐकिलीं आहेत, पण माझी त्यांचीं प्रत्यक्ष ओळख नाहीं; म्हणून तुम्ही हें माझें लिखाण त्यांना नेऊन दाखवा व अभिप्राय विचारा.'

**भानगडींत पडूं नका !**

त्याप्रमाणें श्री. नानासाहेबांनीं श्री. केशवराव महाराज देशमुख यांच्या कानावर ती गोष्ट घातली; पण त्यांनी ती गोष्ट मान्य केली नाहीं. ते सरळ वृत्तीचे. आंत एक बाहेर एक असें त्यांच्याजवळ कधींच नसे. ते श्री. नानासाहेबांस स्पष्टपणें म्हणाले,

"श्रीदासगणूंना म्हणावें या भानगडींत पडूं नका. संतचरित्रें लिहिणें आणि अमृतानुभव लिहिणें या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एक जमली म्हणजे दुसरी जमेलच असें नाहीं. अमृतानुभव हा सामान्य ग्रंथ नव्हे. ज्ञानेश्वर महाराजांच्या खखोल आध्यात्मिक अनुभवाचा तो अमृतमय सांठा आहे. केवळ शब्दांच्या साह्यानें त्यांतील अर्थ समजणें सोपें नाहीं. अनेक लोकांनीं अमृतानुभवावर आजपर्यंत गद्यपद्यात्मक टीका लिहिल्या आहेत; परंतु शिवकल्याणाच्या मागून अमृतानुभवाच्या अर्थाचा उलगडा झाल्याचें कोणाच्याहि टीकेंत आढळून येत नाहीं. मग बुवा या भानगडींत कां पडत आहेत ?"

हा निरोप श्री. नानासाहेबांनीं श्रीदासगणू महाराजांना जशाचा तसा सांगितला. त्यांना या निरोपामुळें वाईट वाटलें. त्यापेक्षां श्री. देशमुखांच्या स्पष्टवक्तेपणांतून

अनुभवास येणारा मनाचा मोकळेपणा पाहून आदरच वाटला. त्यांनीं नंतर स्वतःच श्री. केशवराव महाराज यांना एक ओवीबद्ध पत्र लिहिलें. त्याचा आशय पुढीलप्रमाणें होता.

## श्रीदासगणूंची विनंती

"केशवराव महाराज, आपण अनेक वर्षें श्रीज्ञानोबारायाच्या वाङ्मयाचा निष्ठेनें व्यासंग करीत आहां. या विषयांत आपला अधिकार फार थोर आहे. वैराग्यपूर्ण केलेल्या भक्तीचा आणि निष्कामवृत्तीचा लाभ आपणांस झाला आहे. आपण श्रद्धा-युक्त निष्ठेचे वारकरी आहां, त्यामुळें अध्यात्माच्या पीठांतील आपलें स्थान विद्वान् प्राध्यापकाचें आहे. मीं या महाविद्यालयांतील विद्यार्थी आहे. श्रीसाईबाबांच्या कृपेनें, सद्गुरु श्री. वामनशास्त्री यांच्या आशीर्वादानें मला येथें प्रवेश मिळाला आहे. होईल तसा अभ्यास करून मी परीक्षेला बसलों आणि उत्तरपत्रिका लिहिली. त्यामध्यें अनेक प्रकारच्या चुकाहि असतील; परंतु परीक्षकानें चुकांची कल्पना आधीच करून उत्तर-पत्रिका तपासण्याचें नाकारणें हें योग्य होईल का ? आपण मला उत्तीर्ण करा, असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. तसा वशिला लावणें, हें पातक आहे याची मला पूर्ण जाणीव आहे, परंतु माझें लिखाण तपासा एवढेंहि म्हणण्याचा अधिकार मला नसावा काय ? आजपर्यंत मी संतचरित्रलेखनरूप सेवा निष्कामबुद्धीनें केली आहे. मग अध्यात्माच्या विद्यालयांत प्रवेश मिळून परीक्षेस बसण्याइतकीहि योग्यता त्या सेवेमुळें मला मिळूं नये का ? आपणांस यासाठीं नम्रपणें प्रार्थना करतों कीं, आपण माझें लिखाण तपासावें व मत कळवावें. आपल्या इतक्या योग्यतेचा पुरुष मला दुसरा कोणी आढळला नाहीं. यासाठींच आपणांस विनंति करीत आहे. इतक्यावरहि आपला नकार असल्यास माझें दुर्दैव ! सर्व लिखाण मी चंद्रभागेंत टाकून देतों.'

असें सुमारें शंभर ओव्यांचें पत्र पुण्यांतल्या पुण्यांतच पोस्टानें श्री. केशवराव महाराजांच्या पत्त्यावर पाठविलें. पत्र पोचलें. तें वाचून श्री. केशवराव हंसले आणि श्री. नानासाहेबांस म्हणाले, 'बोवा मोठा विचित्र दिसतो. नाहीं म्हणण्याची सोयच ठेविली नाहीं त्यानें. त्यानें लिहिलेलें पहिलें प्रकरण घेऊन या. कसें आहे तें पाहूं.'

त्याप्रमाणें श्री. नानासाहेबांनीं श्रीदासगणूंच्या जवळून अमृतानुभव भावार्थमंजिरीचें पहिलें ओवीबद्ध प्रकरण श्री. देशमुखांकडे नेऊन दिलें. नीट लक्षपूर्वक वाचून ते म्हणाले, "नानासाहेब, त्यांच्या जवळून सर्व ग्रंथ घेऊन या. मी तो वाचीन पण त्याला वेळ लागेल. घाईनें उरकणारें हें काम नाहीं." त्याप्रमाणें हा निरोप श्री. नानासाहेबांनीं श्रीदासगणूंना सांगितला.

"महाराज, देशमुखांना तुमचा ग्रंथ आवडल्यासारखा दिसतो. त्यांनीं सर्व टीका पाहण्यासाठीं मागितली आहे; पण बरेच दिवस लागतील. तोंवर सर्व त्यांच्याकडे राहिले तर चालतील का ?"

" हो, हो, का नाही ? श्री. केशवराव माझें लिखाण पहाणार आहेत. यांतच मला सर्व भरून पावलें."

## देशमुखांकडून अभिनंदन

श्री. देशमुखांना देण्यासाठीं सर्व ग्रंथ श्री. नानासाहेबांना देण्यांत आला. या गोष्टीस पांच सहा महिने लोटले. पुढें दसऱ्याचे वेळीं नेहमींच्या कार्यक्रमाप्रमाणें महाराज पंढरपुरास गेले. कार्तिक शुद्ध एकादशीच्या दिवशीं सकाळींच श्री. केशवराव महाराज श्रीदासगणूंच्या घरीं दामोदराश्रमांत आले. शुद्ध तुळशीच्या मंजिरीचा एक मोठा हार त्यांनीं बरोबर आणिला होता. तो स्वागतास पुढें आलेल्या श्रीदासगणूंच्या गळ्यांत घालून लवून नमस्कार केला आणि घट्ट आलिंगन देऊन ते भारावलेल्या स्वरानें म्हणाले,

" उत्तम झाली आहे तुमची टीका. मला क्षमा करा. मी उपेक्षाबुद्धीनें आपणांस वाटेल तें बोललों. खरोखरीच सांगतों. अमृतानुभवावरील सर्व टीकांत शिवकल्याणांच्या नित्यानंददीपिकेमागून तुमच्याच भावार्थमंजिरीचें नांव घ्यावें लागेल."

श्री. केशवराव महाराजांच्या या वागण्याबोलण्यामुळें कोमल मनाच्या श्रीदासगणूंना थोडें भांबावल्यासारखें झालें. नम्रतापूर्वक नमस्कार करून ते श्री. केशवरावांना म्हणाले,

" हीं आपली कृपा आहे. आज मला धन्य वाटलें." अमृतानुभव ग्रंथ शके १८५१ मध्यें छापून प्रसिद्ध झाला. अनेक वृत्तपत्रांचे व विद्वानांचे अनुकूल अभिप्राय मग त्यावर मिळाले; पण श्री. केशवराव महाराजांच्या शब्दाइतकें महाराजांना इतरांच्या विस्तृत उत्कृष्ट अभिप्रायाचें महत्त्व वाटलें नाहीं.

## उभययांतील जिव्हाळा

अमृतानुभवाच्या प्रसंगापासून श्री. केशवराव महाराज व श्रीदासगणु महाराज या दोघांचा फारच जिव्हाळ्याचा असा ऋणानुबंध जडला. श्री. केशवराव वारकरी सांप्रदायाचे कट्टर अभिमानी 'एकविधा भाव भक्ताचा स्वधर्म' ही त्यांची निष्ठा; परंतु रामदासी पंथाच्या श्रीदासगणूंविषयींहि त्यांना विशेष आदर वाटत असे. श्रीदासगणूंच्याकडून कांहीं पत्रें, चिठ्ठी आली कीं, नमस्कारासाठीं तें पत्र आधीं मस्तकीं लावून मग वाचीत. उलट श्री. दासगणूंच्या मनामध्यें श्री. केशवराव महाराजांविषयींहि तितकाच आदरभाव होता. आपल्या अनेक अध्यात्मविषयक अडचणी त्यांनीं श्री. देशमुखांना समक्ष वा पत्ररूपानें कळवाव्या व त्यांचा सल्ला मागावा. दोन थोर माणसें एकमेकांशीं किती प्रेमादरानें वागतात, हें ह्या दोघांच्या वर्तनावरून पाहावयास मिळे. एक प्रसंग या दृष्टीनें उल्लेखनीय आहे.

गुरूपदेशाच्या वेळीं दासगणू महाराजांच्या गळ्यांत त्यांनीं घातलेली जी माळ होती, ती पुढें फार दिवस टिकली नाहीं. श्री. वामनशास्त्री कैलासवासी झाल्यावर मग माळेचा विशेष प्रश्नहि उरला नाहीं. पुढें श्रीदासगणू महाराज कीर्तनें करूं लागल्यावर

एकदां सहज धामणगांवास गेले होते. श्री. माणकोजी बोधले या नांवाचे एक फार थोर सत्पुरुष या गांवीं होऊन गेले आहेत. त्यांचे चरित्र मोठें रमणीय आहे. त्यावर एक अत्यंत रसाळ असें आख्यान रचून श्री. बोधलेबोवांच्या समाधीपुढें श्रीदासगणूंनीं कीर्तन केलें. सर्व लोक त्या आख्यानांतील अभिनवता, निर्दोष मांडणी आणि पराकाष्ठेचे भक्तिप्रेम पाहून संतुष्ट झाले. श्री. बोधलेबोवांच्या गादीवर असलेल्या गृहस्थांनीं कीर्तनानंतर श्रीदासगणु महाराजांविषयींचा आदरभाव व्यक्त करण्यासाठीं कांहीं चांगलीं वस्त्रें व बरेच रोख रुपये याप्रमाणें बिदागी आणली. श्रीदासगणूंनीं ती भेट नाकारली.

## बोधलेबुवांचा प्रसाद

'वा ! असं कसं बोवा ? आम्ही आपल्यासारख्यांचा आदर करावयाचा नाहीं, तर करावयाचा तरी कोणाचा ? हा श्रीबोधलेबोवांचा प्रसाद समजा. बिदागी नव्हे.'

'प्रसाद म्हणून देणार असाल, तर हें नको. श्रीबोधलेबोवांच्या समाधीवर जी टपोऱ्या मण्यांची तुळशीची माळ आहे. ती तेवढी मला द्या. हा खरा प्रसाद आहे. माझें रामदासीपण आज वारकरीपणाशीं मिळून जाऊं दे.'

श्रीदासगणु महाराजांना ती माळ देण्यांत आली. तीच त्यांच्या गळ्यांत पुष्कळ दिवस होती. पुढें पुढें त्या माळेंतील मणीहि झिजून उडून कमी होऊं लागले, त्यावेळीं तुळशीची तशीच एक नवीन माळ बनविली. ती कोणा तरी पवित्र माणसाच्या हातानें धारण करावी, या भावनेनें श्री. केशवराव महाराजांच्या हातांत देऊन स्वतःच्या गळ्यांत घालण्यास विनविलें. श्री. केशवराव महाराज या गोष्टीस तयार होईनात. 'आपल्याला माळ घालण्याचा मला काय अधिकार महाराज ?' असें ते नम्रपणानें म्हणालें; पण श्रीदासगणू महाराजांच्या आग्रहापुढें त्यांचें चाललें नाहीं.

श्री. केशवरावांनीं ती माळ श्रीदासगणू महाराजांच्या गळ्यांत घातली. दोघांनीं परस्परांस कडकडून मिठी मारली. श्रीदासगणूंचे हृदय तर भावभक्तीचा सागरच. त्यांचे डोळे अशा प्रसंगानें तेव्हांच ओघळूं लागतात; परंतु श्री. केशवरावांच्याहि डोळ्यांतुन अश्रु ओघळूं लागले. मी लहान होतों; पण तो प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें आजहि जसाच्या तसा उभा आहे.

मी जीं कीर्तनें करूं लागलों, त्यांचीं पहिली सुरवात ती. दादांनीं ( श्रीदासगणु महाराजांनीं ) श्री. केशवराव महाराजांच्या हातुनच करविली. मी १५-१६ वर्षांचा असेन, पहिलें कीर्तन म्हणून पूर्वरंग आणि आख्यान पार घोकून तयार केलें होतें. दोन तीनदां संगीत तालीमहि केली. पण ज्यावेळीं कीर्तनाला उभा राहिलों, तेव्हां श्री. केशवरावमहाराज देशमुख त्यांचे एकनिष्ठ भक्त रावबहादूर गोविंदराव वैद्य इत्यादि मंडळी श्रोते म्हणून बसलेली पाहिली, त्यावेळीं अक्षरशः माझ्या अंगाला घाम सुटला. 'वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते' अशी माझी स्थिति झाली. पाठ केलेल्यांतील एक अक्षरहि आठवेना आणि नवीन काय बोलावें, तेंहि सुचेना. अर्ध्यापाऊण तासांत कसेंतरी सर्व आख्यान

गुंडाळून मी खालीं बसलों. त्यावेळीं कीर्तनाची माळ श्री. केशवरावांनींच माझ्या गळ्यांत घातली आणि ते माझ्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले,

## पाठांतरानें दगा दिला

'बाळ, अरे नदी उगवते तेथें टिपटिपतच असते. तिचा मोठा प्रवाह पुढें होतो. कांहीं काळजी करूं नकोस. घाबरावें कोणाला ? श्रीदासगणूच्या कृपेनें सर्व ठीक होईल.' कीर्तनाला उभा राहिलों कीं, आजहि तो प्रसंग मला बऱ्याच वेळीं आठवतो. त्यावेळीं ती. दादा मला म्हणाले होते,

'अरे, पाठ करून उभा राहिलास म्हणून फजिती झाली. पाठ करून कधीं कथा करूं नये. आज आपल्याला काय सांगावयाचें आहे, त्या विषयापुरती आधीं तयारी करणेंहि फारसें चांगलें नाहीं. खूप वाचावें, खूप विचार करावा आणि प्रामाणिकपणें आपणांस वाटतें तें स्पष्ट सरळ शब्दांत सांगावें. पुन्हां घोकण्याच्या भानगडींत कधीं पडूं नकोस.' हा उपदेश मी अक्षरशः पाळला आणि त्याचा मला फार उपयोगहि झाला. असो.

श्रीदासगणू महाराज हे वारकरी संप्रदायांतील अनुग्रहीत नाहींत. पंथानें ते रामदासी आहेत. ते स्वतःला श्रीसाईबाबांचे भक्त म्हणवितात. ही खिचडी वाटे लोकांना. कट्टर वारकरी आणि पुष्कळसे मठपतिहि आरंभीं आरंभीं श्रीदासगणूमहाराजांना दुजाभावानें वागवीत. कांहीं दुराग्रही मंडळी तर शक्य होईल तेथें त्यांचा पाणउतारा करण्याचाहि प्रयत्न करीत. कीर्तनांत मेलेले साप टाकणें, बेटकुळ्या सोडणें यासारखे प्रसंग तर पुष्कळच घडत. एकदां अतिप्रसंगाची पराकाष्ठा झाली. पंढरपूरच्या जुन्या पेठेंतील चौकांत श्रीदासगणू महाराजांचें कीर्तन चालू होतें. साथीला मागें श्री. दामूअण्णा आणि श्री. किसनराव होते. दोन अडीच हजार लोक कथा ऐकण्यांत तल्लीन झाले होतें. कथा ऐन रंगांत आली होती. तोंच कोणी तरी चार डुकरें आणून त्या गर्दींत सोडलीं. ईऽशीऽ करीत लोक बाजूला होऊं लागले. फार गडबड उडाली. गोंधळ झाला. डुकरें आलीं तीं थेट महाराजांच्या पायाशीं असलेल्या मोकळ्या जागेपर्यंत. तेथें तीं थोडांशी घोटाळलीं. कथेचा विक्षेप झाला; पण त्याचा राग न धरतां हंसून श्रीदासगणू महाराज आपल्या खणखणींत आवाजांत गर्जून म्हणाले, "श्रोते हो, मुळींच गडबड करूं नका, शांत रहा. बिचाऱ्या डुकरांना श्रीहरीचे गुणानुवाद ऐकण्याचा प्रसंग कधीं येणार ? त्यांनीं ईश्वराकडे अर्ज केला. 'पंढरपुरांत नामांकिक कीर्तनें होत आहेत; पण फार कामामुळें आम्हांला तिकडे जातांच येत नाहीं. आम्हांला रजा मिळावी. थोडा तरी कीर्तनश्रवणाचा लाभ मिळावा.' ईश्वरानें उत्तर पाठविलें. 'डुकरांनो, आपलें कर्तव्य करीत राहणें हीच माझी भक्ति आहे; परंतु तुम्ही जर कोणाला बदली देत असाल आपलें काम करण्यास, तर कीर्तनाला जावयाला माझी ना नाहीं' पंढरपूरचे कांहीं वारकरी मोठे दयाळू. ते डुकरांना म्हणाले, 'बाबांनो, जा तुम्ही आजच्या कथेला. आम्ही तुमचें काम करतों.'

## महाराजांचा खेळकर शांतपणा

श्रीमहाराजांचें हें भाषण ऐकतांच सर्व समाज असा खदखदून हंसला कीं, विचारतां सोय नाहीं. विक्षेपामुळें आलेला व्यत्यय पार दूर झाला आणि कीर्तनकारांच्या समयसूचकतेचें कौतुक करीत व खेळकर शांतपणाविषयीं आदर बाळगीत श्रोते पुन्हां कथानंदांत रंगून गेले. श्री. तात्यासाहेब कवठाळकरांसारखे कांहीं पंढरपूरचे लोक त्यावेळीं घडणाऱ्या या तऱ्हेच्या गंमती आजहि मोठ्या मौजेनें सांगतात. श्रीदासगणू महाराज याविषयीं सांगतांना म्हणतात कीं, 'मला पंढरपुरांत आरंभीं विटाळ होता. पुढें बरेंच दिवसांनीं तो गेला. गेल्या कांहीं वर्षांत मात्र मी पूर्णपणें सोवळा झालों आहे.'

पंढरपुरांत असलेला श्रीमहाराजांविषयींचा हा दुजाभाव पुढें पार नष्ट झाला. सगळ्या मठपतींच्या मठांतून मग श्रीदासगणूमहाराजांचीं कीर्तनें वरचेवर होऊं लागलीं. कांहीं तर त्यांचे जविश्वकंठश्व मित्र बनले. कै. श्रीमहिपतीमहाराज यांचें नांव या मैत्रीचें उत्तम उदाहरण म्हणून सांगतां येईल. कै. श्री. थोरल्या अंमळनेरकरमहाराजांच्या प्रेमळ आग्रहावरून श्रीदासगणूमहाराज रामानुजपद्धतीचे दोन्ही बाजूला गोपीचंदनाचे रुंद पट्टे व मध्यंतरी कुंकवाची जाड रेघ अशा रीतीचें गंध कपाळावर लावूं लागले. थोरले अंमळनेरकरमहाराज होते, तोंपर्यंत कुंकवाकरितां आरसा बसविलेली चांदीची डबी व गंध लावण्यासाठीं चांदीची काडी ते दरवर्षी प्रेमाची भेट म्हणून श्रीदासगणूंना देत. महाराजहि प्रतिवर्षी अंमळनेरकरांना आपल्या घरीं (पंढरपूर येथील दामोदराश्रम) बोलावून विशेष आदरानें सत्कार करीत. पंढरपुरांस झालेल्या मंदिरप्रवेशाच्या भानगडींपर्यंत ही पद्धति चालू होती.

---

—"छायेच्या मागें धांवू नका, ती तुमच्यापासून दूर धांवेल. तिच्याकडे पाठ फिरवा, ती तुमच्या मागून धांवत येईल. जगाचा नाद धरूं नका, जग तुमच्याकडे लक्ष देणार नाहीं. जगाला तृणवत् माना तें तुम्हांला हृदय सिंहासनावर बसवील.

—विवेकानंद

⁂ उत्कृष्ट कागद ⁂ आकर्षक रचना
⁂ स्वच्छ व सुबक छपाई
बॉम्बे सेंट्रल प्रेस
मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं
जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार मुंबई २

# अल्पबचत योजनेचें महत्त्व

लेखक : आप्पाराव

जनतेंतील सर्व थरांतील–गोरगरीबसुद्धां–लोकांना संसारांत काटकसर करून अल्पप्रमाणांत का होईना बचत करण्याची संवय लागावी व तिचा उपयोग जनहिताच्या योजनांसाठी व्हावा या हेतूनें आपल्या सरकारतर्फे अल्पबचत योजना सुरू करण्यांत आली आहे व या योजनाचा सर्व थरांतील सर्व ठिकाणीं रहाणाऱ्या लोकांना यथाशक्ति फायदा व्हावा यासाठी या योजनचें जाळें देशभर सर्वत्र पसरविण्यांत आलें आहे. शहरांतून त्याचप्रमाणें खेड्यापाड्यांतून रहाणाऱ्या लोकांनाही अल्पबचत योजनेचा फायदा करून घेतां यावा अशी योजना आखण्यांत आली आहे.

## सुखसमाधानाची गुरुकिल्ली

प्रत्येक कुटुंबांत सुख व समाधान नांदण्यावर देशाचें वैभव सुख समाधान अवलंबून आहे. लक्षावधि कुटुंबें मिळून प्रांत व देश बनलेला आहे. कुटुंब हा गांवाचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा व प्रांताचा तसाच देशाचा घटक आहे कीं नाहीं ? कुटुंब दुःखी तर देशही दुःखी !

कुटुंबाच्या संसारांत काटकसर व बचत हीं दोन अंगें अत्यंत महत्वाचीं आहेत. ज्या कुटुंबांत अवास्तव व वाजवीपेक्षां फाजील खर्च केला जातो, अविचारानें उधळपट्टी केली जाते. वेळ प्रसंगीं, संकट प्रसंगीं उपयोगी पडावी म्हणून बचत मुळींच केली जात नाहीं, त्या कुटुंबाची घडगत नाहीं म्हणून समजावें.

प्रत्येक व्यक्तीनें व कुटुंबानें सुखसमाधानांत नांदावें यावर साईबाबांचें कटाक्षपूर्वक लक्ष असे. नीति धर्मानें वागा, माणुसकीला पारखे होऊं नका, एकमेकांस सहाय्य करून वैभवश्री भोगा असें बाबांचें सांगणें असे.

या जगांतील व्यवहारांत सर्वांत भारी महत्त्व जर कशाला असेल तर तें पैशाअडक्याला. घातपात, चढाओढ, मारामाऱ्या कशासाठीं होतात ? पैशासाठीं ! पैसा हा सुखाचा मूलभूत पाया आहे. त्याच्या अभावीं मनुष्य वाटेल ते अत्याचार करण्यास व माणुसकीला मुकण्यास तयार होतो.

## अवास्तव खर्च टाळा

प्रत्येक मनुष्यानें भरपूर मेहनत घऊन पसा मिळवावा व अवास्तव खर्च न करतां कांटकसर करून पैशांची बचत करावी हा सरळ व सुखाचा मार्ग आहे; परंतु दुदवाची गोष्ट म्हणजे त्याचा आम्हांला विसर पडला आहे. तो मार्ग सुखाकडे नेणारा असून त्याला आम्हीं पारखे झालेलें आहोंत अहो ! तो आमच्या गावींच नाही !

तो तुमच्या गावीं यावा; ध्यानीं-मनीं यावा, तुमच्या आचरणांत यावा यासाठीं सरकारला अल्पबचत योजना जनतेपुढें आणावी लागली आहे.

## पंचवार्षिक योजनेस सहाय्य

त्या योजनेची कांस धरली असतां काय होतें ? तुम्हीं सुखी होतां. तुम्हीं देशकार्याला व समाजकार्याला हातभार लावूं शकतां. सर्वांच्या सुखासाठीं व्यापार व उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं आपल्या सरकारनें पंचवार्षिक योजना अंमलांत आणिली आहे. ती कोट्यावधि रुपये खर्चाची योजना आहे. त्या योजनेसाठीं लागणारा मुबलक पैसा एकट्या सरकारनें तरी कुठून आणा-वयाचा ! 'दसका लकडी एक का बोजा' या न्यायानें बचत योजनेचे रोखे आपल्या शक्तिप्रमाणें घेऊन व त्यांत आपली अल्पस्वल्प बचत रोखून त्या रूपानें आपण त्या अवाढव्य पंचवार्षिक योजनेला हातभार लावूं शकता. गुंतविलेल्या रकमेवर तुम्हांला प्रतिवर्षी व्याज मिळूं शकतें. शिवाय बचतरोखे ठराविक मुदतीचे असल्यामुळें त्या मुदतीनंतर तुमची रकम तुम्हांला सव्याज मिळूं शकते. तिचा तुम्हांला जरुरीप्रमाणें वेळप्रसंगीं योग्य कारणीं खर्च करतां येतो.


**अल्प बचत योजनेंत पैसा गुंतवा**

**काटकसरीचीं कांस धरा**

**आणि**

**संसार सुखाचा करा !**


## नवभारत निर्मितीत सहकार

अल्पबचत योजनेमुळें पंचवार्षिक योजनेसाठीं भांडवल तर मिळतेंच पण त्याशिवाय प्रत्येक भारतीयास नवभारताच्या निर्मितींत सहभागी होण्याची सुसंधीही मिळते.

ही अल्पबचत योजना साऱ्या देशभर चालू आहे. पूर्वी वेगळ्या स्वरूपांत ही योजना सुरू असली तरी सध्यांच्या लोकप्रिय स्वरूपांत ती १९५८ पासून सुरूं आहे. सर्व प्रांतामध्यें आपल्या प्रांतानें या योजनेच्या बाबतींत उच्चांक पटकाविला आहे. १९५८–५९ चे आंकडे पाहिले तर मुंबई राज्यांत या योजनेंत सुमारें २४ कोटी रु. गुंतविले गेले. त्याच्या खालोखाल क्रमांक लागतो बंगालचा ( ९ कोटी रु. ) यावरून या प्रांतांतील बहुजन समाजास अल्पबचत योजनेचें महत्त्व समजलें आहे व पटलें आहे हें स्पष्ट होत आहे.

अल्पबचत योजनेची जरूर ती सर्व प्रकारची माहिती व तत्संबंधीं नियम व कागदपत्र तुम्हीं लगतल्या पोस्ट ऑफिसांत गेलां असतां समजूं शकतील व मिळूं शकतील.

# ‘साधा परमानंद एका भावें’

काय तो विवाद असो भेदाभेद । साधा परमानंद एका भावें ॥
निघोनि आयुष्य जातें हातोहात । विचारीं पां हित लवलाहीं ॥
तुका म्हणे भावभक्ति हें कारण । नागवी भूषण दंभ तोचि ॥

या अभंगामध्यें तुकोबा म्हणतात, निरर्थक वादाविवाद करण्याचें काय प्रयोजन आहे ? व लोकांमधील भिन्न भिन्न मतांचा एवढा बाऊ तरी कां करितां ? एकच ध्येय पुढें ठेवून परमशांति प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करा. आयुष्याचे दिवस झपाट्यानें चालले आहेत. अजून तरी तुमचें कल्याण कशांत आहे याचा विचार करा. भाव व प्रेम यायोगेंच परमानंद प्राप्त होणार आहे, दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं. वादविवाद आणि बुद्धिची घमेंड यांमुळें तो नाहींसा होतो.

आपणांला असें वाटण्याचा संभव आहे कीं, तुकोबांनीं हें जें ध्येय आपणांपुढें ठेविलें आहे, तें प्रचारांत आणणें अशक्य होय. पुरातन कालापासून साधूंनीं या वादविवादाचा व मतमतांतरांचा निषेध केलेला आहे, परंतु जग हें आहे तसेंच आहे. जसजसे साधु निर्माण होत गेले, तसतशी निरनिराळीं व विरुद्ध दिसणारीं मतें वाढत गेलीं. सर्व मतांची एकवाक्यता करण्यामध्यें कोणत्या साधूला यश आलें आहे ! शाश्वतच्या गोष्टी तुकोबांनीं आम्हांस शिकविल्या आहेत; म्हणून ते आम्हांस वंदनीय आहेत; परंतु निदान या अभंगांत तरी तुकोबा जें म्हणतात तें निव्वळ स्वप्नवत् आहे, अशा प्रकारांचा संशय हा अभंग प्रथम वाचल्यानें आपल्या मनामध्यें होण्याचा संभव आहे.

## या जीवनांत साधायचें काय ?

परंतु या अभंगाचा आपण शांतपणें विचार करून त्यांतील मर्म जाणण्याचा प्रयत्न केला तर, आपणांस असें आढळून येईल कीं, तुकोबांनीं जें कांहीं सांगितलें आहे त्याची खात्री आपल्यालाही संसारांत पटते. तुकोबा जें बोलतात तें त्यांच्या स्फूर्तीमुळें; परंतु अशा उक्तींतील त्यांचा प्रत्येक शब्द इतका खोल व विचारवंत असतो कीं, जणुं काय त्यावर तुकोबांनीं पुष्कळ विचार केला आहे, आणि त्यांमधील विचारांचा एकमेकांशीं पूर्णपणें मेळ आहे, असें आपणांस वाटतें. तुकाबाच्या वरील अभंगावरून दिसून येतें कीं, जगामध्यें भिन्नपणा पाहिजे, सुंदर एकरूपतेमुळें समाज बधिर होतो. भिन्न भिन्न मतें योग्य रीतीनें वाखाणलीं जाऊन त्यांचा एकमेकांशीं मेळ बसतो.

लेल्यांचें जें ऐक्य तें ऐक्य खरें, या गोष्टीची तुकोबास पूर्ण जाणीव होती. मतामतांमधील सर्व भिन्नपणा काढून टाका, असें ते आपणांस सांगत नाहींत. ईश्वरानें निरनिराळ्या राष्ट्रांस निरनिराळ्या रीतीनें आपणांस प्रकट केलें आहे, म्हणून प्रत्येक धर्मामध्यें ईश्वरी सत्याचा अंश आहे, व आपापल्यापरीं प्रत्येक धर्माला किंमत आहे. धर्मभेदामुळें देखील प्रगति झालेली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. धर्मांची स्थापना कशा करितां झाली, याच्या पूर्ण जाणीवेमुळें तो धर्मभेद उत्पन्न होतो, आणि यामुळें त्याची वाढ होते. परंतु यावेळीं आपण ही गोष्ट लक्षांत ठेवली ठेविली पाहिजे कीं, कोणत्याही धर्मामध्यें ईश्वरीसत्य पूर्णपणें उघडकीस आलेलें नाहीं, आणि शिवाय त्या धर्मांमधील सत्य नुसतें समजल्यानें फारसा फायदाही होत नाहीं; त्यायोगें ज्ञानाचा आपणांस गर्व होण्याचा संभव आहे. आपल्या जीवितामध्यें आपण जी गोष्ट करावयाची ती परमानंद प्राप्त करून घेणें ही होय. यालाच **वर्डस्वर्थ** कवि ( The inner ecstasy or the gleam divine ) असें म्हणतो. या स्वानंदाचें सामर्थ्य ओळखणें जरूर आहे.

## जें द्यावें तें मिळवावें

प्रथम, आपण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हा आनंद प्राप्त करून घेण्याकरितां आपण श्रम केलें पाहिजेत. ईश्वराच्या राज्यामध्यें आपण जें देतों तें आपणांला मिळतें; म्हणून हा आनंद मिळवावयाचा तो आत्मप्रतिष्ठेनें नव्हे तर दुसऱ्याविषयीं सहानुभूति व प्रेम दाखवून मिळविला पाहिजे, आपण जर आपल्या आयुष्याचें चांगल्या रीतीनें निरीक्षण केलें, तर आपलें आयुष्य देखील आपणांस हीच गोष्ट शिकवितें, असें आपल्या लक्षांत येईल. ज्या मनुष्यास दिवसभर काबाडकष्ट करावे लागतात, अशा मनुष्याचें उदाहरण घ्या. दिवसभर काम केल्यानंतर तो रात्रीं घरीं येतो. त्या वेळेस त्याचीं मुलें झोंपीं गेलेली असतात, त्याची बायको त्याला जेवण वाढतें व आपली घरांतील कामें करूं लागते. जेवण झाल्यानंतर तो निजावयास जातो, पण झोंप म्हणून त्याला कांहीं येत नाहीं, कदाचित् त्याचा धनी त्याच्यावर रागावलेला असेल, त्यानें आपल्या कपाळास आंठ्या घातलेल्या असतील, याची त्याला आठवण झाली असेल. त्याला कोणीं फसविलें असेल, किंवा कोणीं त्याची आगळिक केली असेल किंवा पैशाची त्याला पंचाईत पडली असेल, अशा प्रकारच्या काळज्या त्याच्या अंतःकरणामध्यें डंवचत असल्यामुळें त्याचें मन अस्वस्थ होऊन त्याला झोंप येत नाहीं. तो आपल्या बिछान्यावरून उठतो, बाहेर जातो, आणि आकाशाकडे पाहतो. त्या ठिकाणीं जी स्तब्धता व जें वैभव असलेलें त्याला दिसतें, त्यायोगें त्याच्या मनाला भीति वाटते. हजारों वर्षें गेलीं, लाखों मनुष्यें जन्मास आलीं, आणि नाहींशीं झालीं. पण ती स्तब्धता व तें वैभव कायम आहे. त्यायोगें त्याच्यामध्यें नम्रभाव उत्पन्न होऊन तो आपणांशीं म्हणतो, 'माझ्या दुःखांचा बाऊ करून त्यांविषयीं कुरकुर करणारा मी कोण क्षुद्र प्राणी ! मी आज

जिवंत आहे. तर उद्यां नाहीं, अशी माझी स्थिति.' आतां त्याच्या ठिकाणीं जी लीनता जागृत झाली, त्यामध्यें नित्याच्या अनुभवापेक्षां विशेष कांहीं तरी आहे, एवढें खरें. त्याच्या अंतःकरणामध्यें असा विचार आला खरा पण तो कसा आला? ज्या प्रकारचा प्रकाश त्याला हवा होता, तसाच प्रकाश त्याला कोठून मिळाला? हा जो त्याला लाभ झाला, जो अधिकार प्राप्त झाला त्याच्या योगें दुःखाचे तीव्र प्रहार सहन करण्याचें, निराशेच्या प्रसंगास तोंड देण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त झालें. हें कसें झालें हें ज्याला समजेल त्यास अंतरींचा आनंद, अंतरींचें तेज, त्याचें ज्ञानहि होतें.

## परमानंद कोणाला मिळतो?

हा प्रकाश, हा अधिकार, हा परमानंद, जे कोणी परमेश्वराला आपल्या अंतःकरणांत, आपल्या शुद्ध पवित्र केलेल्या अंतःकरणांत, पाहण्याकरितां झटतात त्यांसच तो लाभतो; त्यांनाच आपल्या जीविताची व या जगताची कल्पना करून घेते, अशा त्या अंतःकरणासच शांति, प्रेम, सौंदर्य, वैभव, न्याय व नीति यांची योग्य कल्पना होते. पर्वत, समुद्र अथवा पृथ्वी यांचें वैभव पाहून एकादा चितारी त्या वैभवाचें चित्र रेखाटतो, पण तें सौंदर्य प्रथम त्याच्या अंतःकरणामध्यें त्याला दिसतें, म्हणजे त्या सौंदर्याचा ठसा प्रथम त्याच्या अंतःकरणावर होतो. असें न होईल तर त्याला बाहेरचें सौंदर्य दिसणार नाहीं. एखाद्या कवीला स्वतःच्या अंतःकरणामध्यें कांहीं सौंदर्य दिसलें तरच त्याचें हुबेहुब चित्र तो जगाकरितां काढील.

हा परमानंद म्हणजे काय व तो कसा प्राप्त करून घ्यावयाचा, याबद्दल नुकतीच घडून आलेली एका शाळेंतील मुलाची गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते. एका गरीब विधवेला एकुलता एक मुलगा होता. तिनें त्याला एका सार्वजनिक शाळेंत घातलें. तो कांहीं हुशार मुलगा नव्हता; आणि तशांत तो लंगडा होता. शाळेंतील कोणीही मुलगा सोबती नसल्यामुळें उत्तेजनकारक असें शाळेंत कांहींच नाहीं, असें त्याला वाटूं लागलें, त्याची अनाथ स्थिति त्याला फार भासूं लागली, आणि ती शाळा नरकवासाप्रमाणें त्याला दिसूं लागली. एके दिवशीं आपली वाईट स्थिति इतर दिवसांपेक्षां अधिक कष्टप्रद त्याला वाटून त्याच्या डोळ्यांतून दुःखाश्रु आले, आणि त्यानें ईश्वराचा धांवा केला. ईश्वरानें त्याची प्रार्थना ऐकली, आणि दुसरे दिवशीं सकाळीं त्याच्या प्रेमळ आईकडून धीर देणारें पत्र त्याला आलें. त्या पत्राच्या योगानें त्याच्याविषयीं त्याच्या आईच्या अंतःकरणांत किती प्रेम भरून राहिलें आहे, याची त्याला खात्री झाली. ईश्वरानें आपणांस ज्या स्थितीमध्यें ठेविलें आहे, त्या स्थितीमध्येंच समाधान मानलें पाहिजें, हें त्याला समजून, शाळेंतील मुलांनीं आपला जरी हेवा केला, तरी तो सहन केला पाहिजे, हें सामर्थ्य त्याला प्राप्त झालें. दुसरा कोणीहि त्याच्याशीं निष्ठुरतेनें वागला, तरी तो त्याच्यावर प्रेम करी व आपल्या अभ्यासांत सदां निमग्न राही. अशा रीतीनें पुढें तो त्या शाळेमधील एक प्रख्यात विद्यार्थी झाला.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | – by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य (मराठी) | श्री. घोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** (Eng.) | Calcutta | ०० ७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of S.i Baba by Neroy

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone | 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, | $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai | $9\frac{1}{2}$" × $13\frac{1}{2}$" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive cfficer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.

July 1963

Regd. No. B 7989



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

**५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई**

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : दा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४

संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४.